■ RNI NO. MAHMAR/2020/79996 नवे विचार...नवी सुरुवात ■ Postal Reg. No. SGL/135/2025-2027

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : **गणेश पाटील** (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ७५ ■ बुधवार, १८ जून २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# ‘आयारामां’ची वाढती संख्या

# ‘स्थानिक’ ची निवडणूक सांगलीत ‘स्वबळावर’ लढण्याची शक्यता..?

## मात्र कोल्हापूरकरांचा ‘महायुती’चा घोषा..!




**सांगली/कोल्हापूर : विशेष प्रतिनिधी**

**सांगली जिल्ह्यात सद्यस्थितीत राष्ट्रवादी अजितदादा गटाकडे वाढलेला ‘आयारामां’चा लोंढा पाहता यावेळची निवडणूक महायुती, महाविकास आघाडी बासणात गुंडाळून स्वबळावरच लढण्याची शक्यता राजकीय जाणकारांतून व्यक्त केली जात आहे.**

अशीच निवडणूक झाली तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीला काही प्रमाणात ताकद येण्याची शक्यता आहे. सांगली महापालिकेच्या ७८ जागांसाठी तर एका वाढीव जागेसह सांगली जिल्हापरिषदेच्या ६१ जागांसाठी महायुती म्हणून निवडणूक झाली तर जागा वाटपाचा घोळ वाढणार असून त्यामुळे बंडखोरीची शक्यता मोठ्या प्रमाणावर बळावणार आहे. महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेत इच्छुकांची भरमार आहे. प्रदिर्घ काळ लांबलेल्या स्थानिकच्या निवडणुकांमुळे नेत्यांना महापालिकेत, जिल्हा परिषदेत जाण्याची घाई झालेली आहे. त्यातच सांगली जिल्ह्यातील महिला नेत्या जयश्रीताई पाटील भाजपच्या वाटेवर आहेत. काँग्रेसकडून गेल्या निवडणुकीत निवडून आलेले जवळजवळ १७ माजी नगरसेवक जयश्रीताई पाटील यांच्या गटात आहेत. माजी नगरसेवक असल्यामुळे प्रत्येकजण उमेदवारीसाठी हक्क सांगणारच. त्यामुळेच वाढत्या इच्छुकांच्या संख्येमुळे नेते पेचात पडले आहेत. जागावाटपात होणारा संभाव्य संघर्ष टाळण्यासाठीच भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांमधून स्वबळावर निवडणूक लढवावी, अशी मागणी सांगलीत वाढत आहे. सांगलीत भाजप, राष्ट्रवादीचे प्राबल्य आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात मात्र भाजप नेत्यांनी गोकुळ दुधसंघाच्या निवडणुकीपासून धडा घेतला असून काँग्रेस नेते सतेज पाटील आणि राष्ट्रवादीचे नेते मंत्री हसन मुश्रीफ यांच्यातील सख्य लक्षात घेऊन स्थानिकची निवडणूक ‘महायुती’मधूनच लढण्याचा निर्णय घेतला आहे. कोल्हापुरच्या राजकारणात नऊ वर्षे एकत्र राहून सतेज पाटील आणि मंत्री हसन मुश्रीफ यांनी आपली ताकद दाखवून दिलेली असून त्याचीच धास्ती भाजप नेत्यांनी घेतली असल्यामुळे महायुतीतर्फेच निवडणूक लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. शिवाय जिल्हा नियोजन समितीत आमदारांना ७० टक्के, पालकमंत्र्यांना ३० टक्के निधीचे वाटप करण्याचा निर्णय बैठकीत घेऊन जिल्ह्यातील राष्ट्रवादीला सत्ता विकेंद्रीकरणाचे गाजर दाखविण्यात आले आहे. त्यामुळेच युतीच्या नेत्यांनी एकजूट दाखवत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीसाठी कंबर कसल्याचे पाहायला मिळत आहे.

भाजप ४८, शिवसेना २९ आणि अजित पवारांची राष्ट्रवादी २३ टक्के असे सूत्र निश्चित झाले असून त्यानुसार सांगली जिल्ह्यातही वेगवेगळ्या समित्यांवर नियुक्त्या केल्या जाणार आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद, महापालिकेसह सर्व निवडणुका एकत्रित लढण्याचा निर्णय एकमताने झाला असला तरी आता जागावाटप कसे होणार? आणि कोणत्या पक्षाला किती जागा दिल्या जाणार? याकडे राजकीय जाणकारांचे लक्ष लागून राहिले आहे.

## संक्षिप्त...

### चार हजार विद्यार्थी वारकऱ्यांच्या सेवेला

**सोलापूर : हॅलो प्रभात**

राष्ट्रीय सेवा योजनेचे (एनएसएस) स्वयंसेवक आषाढी वारीत सहभागी होऊन एकता आणि समरसतेचे दर्शन घडवणार आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठांतर्गत चार हजार एनएसएसचे स्वयंसेवक यात सहभागी होतील.

### कोल्हापूर जिल्ह्यात मुसळधार पावसाने पेरण्या खोळंबल्या

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

गुरुवारी झालेला धुवाँधार पाऊस आणि त्यानंतर पुन्हा सुरू झालेली संततधार यामुळे शेतकर्यांची चिंता वाढली आहे. शिवारात पाणी असल्याने अनेक ठिकाणी नांगरटीची कामे खोळंबली आहेत. यामुळे अनेक ठिकाणी पेरण्या ठप्प आहेत. काही ठिकाणी तर पेरलेले बियाणे वाहून गेल्याने खरिपावर संकट आले आहे. यामुळे जिल्ह्यात पाऊस भरपूर आणि शेतकरी चिंतातूर, असेच चित्र आहे.

### धरण क्षेत्रांत अतिवृष्टी; राधानगरीतून विसर्ग वाढवला

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शहरासह जिल्ह्यात रविवारी पावसाने दमदार हजेरी लावली. शहरात दिवसभर सरी कोसळत होत्या. जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार तर काही ठिकाणी मध्यम पाऊस झाला. पाच धरण क्षेत्रांत अतिवृष्टी झाली. राधानगरी धरणातून होणारा विसर्ग सायंकाळी साडेपाच वाजता २५०० क्युसेकपर्यंत वाढवला. गेल्या २४ तासांत १२ तालुक्यांत सरासरी १६.५ मि.मी. पावासाची नोंद झाली. सोमवारी (दि. १६) व मंगळवारी (१७) जिल्ह्याला ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

## कऱ्हाडमधील ६७ इमारती धोकादायक

### धोकादायक इमारतीच्या मालकांना इमारती उतरवण्याबाबत नोटिसा जारी

**कऱ्हाड : हॅलो प्रभात**

शहरामध्ये ६७इमारती धोकादायक अवस्थेत आहेत. नगरपालिकेने शहरातील या धोकादायक इमारतीच्या मालकांना इमारती उतरवण्याबाबत नोटीस दिली आहेत. पालिका इमारत मालकांना वेळोवेळी नोटिसा बजावणी करत आहे; मात्र त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने भविष्यात या इमारती ढासळल्या तर मोठी हानी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

**फोटो न्यूज**




**सांगली - हॅलो प्रभात :** सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांना रोखण्यासाठी ‘येथे कचरा टाकू नये’ असा फलक लावण्याचे आदेश दिले होते. परंतु आयुक्तांच्या याच आदेशाला नागरिकांकडून धाब्यावर बसवले जाते?

## कुरुंदवाड कचरामुक्तीच्या प्रतीक्षेत?

### प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांत तीव्र नाराजी

**कुरुंदवाड : हॅलो प्रभात**

कुरुंदवाड शहर ङ्गकचरामुक्तफ कधी होणार, हा प्रश्न सध्या येथील नागरिकांना सतावत आहे. शहराच्या विविध भागांत कचऱ्याचे ढिगारे साचल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



नाईक गल्ली भैरववाडी, जुन्या पुलाजवळ कचऱ्याचा मोठा ढीग साचला असून, कित्येक दिवसांपासून तो उचलला गेला नसल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहेत. यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून, साथीचे रोग पसरण्याची भीती व्यक्त होत आहे.

त्याचबरोबर, काळाराम मंदिरा जवळील भागातील गटारींमध्येही मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने गटारी तुंबल्या आहेत. यामुळे सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसून, अस्वच्छतेमुळे परिसरातील रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे.

काळाराम मंदिर जवळील रोडवरील लाईटच्या डीपीखालीही कचऱ्याचा ढीग साचलेला आहे. या कचऱ्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या कर्मचाऱ्यांना डीपीवर काही काम करायचे असल्यास, या घाणीतून वाट काढत कसरत करावी लागत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.

एकंदरीत,कचऱ्याचे टेंडर काढून देखील कुरुंदवाड शहरातील कचरा व्यवस्थापनाचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे. नागरिकांकडून सातत्याने तक्रारी करूनही प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप होत आहे. शहराला कचरामुक्त करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# चांगल्या संस्कारातूनआदर्श भावी पिढी घडवावी

## पालकमंत्री चंद्रकांत पाटील : शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमांना उपस्थिती

**सांगली : हॅलो प्रभात**

शैक्षणिक वर्षारंभापासूनच विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी बाणवाव्यात. शिस्त, वेळेचे महत्त्व, पुस्तकवाचन, मैदानी खेळ, फटाक्यांना फाटा देऊन प्रदूषणास आळा व पर्यावरण संवर्धन, तंबाखू व अमली पदार्थ व्यसनापासून दूर राहणे यांचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रुजवावे. उत्तम शैक्षणिक सुविधा व चांगले संस्कार यातून आदर्श भावी पिढी घडवावी, असे प्रतिपादन राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज केले.



शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ वर्षारंभ विद्यार्थी प्रवेशोत्सव कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. जिल्हा परिषद शाळा, बामणोली व सांगली मिरज कुपवाड महापालिका शाळा क्रमांक ७ सांगली येथे पालकमंत्री चंद्रकांत पाटील व अन्य मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. तसेच, मोफत गणवेश व पुस्तके वितरीत करण्यात आली.

जिल्हा परिषद शाळा बामणोली येथील कार्यक्रमात खासदार विशाल पाटील, आमदार सुधीर गाडगीळ, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) मोहन गायकवाड तर महापालिका शाळा क्रमांक ७ येथील कार्यक्रमात आमदार सुधीर गाडगीळ, मनपा आयुक्त सत्यम गांधी, अतिरीक्त आयुक्त रविकांत आडसूळ, उपायुक्त स्मृती पाटील, माजी उपमहापौर शेखर इनामदार, मुख्याध्यापिका स्मिता सौंदते यांच्यासह महानगरपालिका माजी पदाधिकारी उपस्थित होते.




# थोर समाजसुधारक : गोपाळ गणेश आगरकर

**हॅलो प्रभात**

**एक बुद्धिप्रामाण्यवादी विचारवंत आणि थोर समाजसुधारक म्हणजे गोपाळ गणेश आगरकर. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यातील टेंभू या गावी गरीब घराण्यात झाला. हालअपेष्टांना तोंड देत कराड, रत्नागिरी, अकोला आणि पुणे येथे राहून ते एम. ए. झाले.**

महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी पुण्यात निर्माण केलेल्या जहाल विचारांच्या राष्ट्रवादी पंथास ते लोकमान्य टिळकांसह जाऊन मिळाले. लोकशिक्षण आणि लोकजागृती करण्यासाठी या तिघांनी पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल' स्थापन केले (१८८०), तसेच केसरी आणि मराठा (इंग्रजी) ही पत्रे चालू केली (१८८१). न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आगरकरांनी अध्यापनाचे काम केले. त्याचप्रमाणे 'केसरी'च्या संपादनाची जबाबदारी स्वीकारून परिणामकारक लेखन आणि कुशल संपादन यांच्या जोरावर अल्पावधीतच 'केसरी'ला लोकप्रियता प्राप्त करून दिली. न्यू इंग्लिश स्कूलच्या चालकांनी स्थापन केलेल्या 'डेक्कन एज्युकेशन सोसायटी' च्या 'फर्ग्युसन महाविद्यालया'चे प्राचार्य (१८९२) म्हणूनही त्यांनी काम केले.

### स्टयूअर्ट मिल आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारांनी त्यांचे मन संस्कारित

महाविद्यालयीन जीवनातच जॉन स्टयूअर्ट मिल आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारांनी त्यांचे मन संस्कारित झाल्यामुळे त्यांचा दृष्टिकोन बुद्धिप्रामाण्यवादी आणि अज्ञेयवादी झालेला होता. याच दृष्टिकोनातून तत्कालीन समाजाची पुनर्घटना करण्याची आवश्यकता त्यांना वाटत होती. 'केसरी'तील त्यांच्या सामाजिक लेखांतून हीच भूमिका व्यक्त होऊ लागली. पण सामाजिक प्रश्नांच्या जाणिवेपेक्षा राजकीय प्रश्नांची जाणीव अधिक तीव्र असली पाहिजे, असे 'केसरी' आणि 'मराठा'च्या चालकमंडळींस वाटत असल्यामुळे, आगरकरांचा वैचारिक कोंडमारा होऊ लागला. परिणामत: ते 'केसरी'तून बाहेर पडले (१८८७) आणि आपल्या क्रांतिकारक सामाजिक विचारांच्या प्रतिपादन-प्रसारासाठी त्यांनी 'सुधारक' हे साप्ताहिक काढले (१८८८). त्यात राजकीय आणि अर्थशास्त्रविषयक लेखही येत.

### अन्याय्य रूढी आणि परंपरा यांच्यावर कडाडून हल्ले

बुद्धिवादी दृष्टिकोनातून समाजजीवनाचे विश्लेषण करून अन्याय्य रूढी आणि परंपरा यांच्यावर त्यांनी कडाडून हल्ले चढविले. बुद्धीच्या निकषांखेरीज अन्य कोणताही निकष ते मानीत नसल्यामुळे समाजसुधारणांचे समर्थन करण्यासाठी स्मृतिवचनांचा आधार घेणे त्यांना मान्य नव्हते. नीतिमान आणि सदाचरणी समाजाच्या निर्मितीसाठी ईश्वर आणि धर्म यांचीही आवश्यकता त्यांना वाटत नव्हती. परोपकारादी सद्गुण धर्माच्या आधी अस्तित्वात आले असून नंतर धर्मात ते गोवले गेले, अशी त्यांची भूमिका होती. बुद्धिवाद, व्यक्तिवाद, समता आणि मानवतावाद या चतु:-सूत्रीने त्यांचा सारा सामाजिक विचार व्यापलेला होता. साहजिकच, पूर्वजन्म आणि पुर्नजन्म यांसारख्या कल्पनांवर त्यांचा विश्वास नव्हता आणि चातुर्वर्ण्य, जातिसंस्था, अस्पृश्यता, बालविवाह इ. गोष्टी त्यांना सर्वथैव अमान्य होत्या. मनुष्यजातीचे ऐहिक सुखवर्धन हेच त्यांचे ध्येय बनले होते. तथापि निव्वळ इंद्रियसुखालाच ऐहिक सुख मानण्याइतपत त्यांची दृष्टी संकुचित नव्हती. नीतिमान आणि संयमी जीवनामुळे मनाला लाभणारे समाधानही या ऐहिक सुखात त्यांना अभिप्रेत होते.

व्यक्तिस्वातंत्र्यामुळे स्वार्थ आणि स्वैराचार फैलावण्याऐवजी समाजातील व्यक्ती परोपकारी आणि परहितचिंतकच होतील, असे त्यांना वाटे. उलट व्यक्तिस्वातंत्र्य न मानणाऱ्या व निरुपयोगी परंपरांनी वेढलेल्या समाजाची केव्हाही प्रगती होऊ शकणार नाही, अशी त्यांची धारणा होती. परंपरांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन ऐतिहासिक होता; त्यामुळे एखादी गोष्ट समाजाच्या एका अवस्थेत उपयुक्त ठरली असेल, हे ते मान्य करीत; मात्र तीच गोष्ट बदलत्या काळात जाचक ठरल्यास बिनदिक्कतपणे टाकून द्यावी, असे ते म्हणत. अशा रूढी आणि परंपरा स्वखुषीने सोडून द्यावयास समाज तयार नसेल, तर त्या कायद्याने नाहीशा कराव्या, असे त्यांचे मत होते.

त्यांचे हे विचार तत्कालीन अंधश्रद्ध सामान्यांना समजलेच नाहीत. तथापि टिळकांसारख्या सुशिक्षित आणि चिंतनशील व्यक्तींचाही त्यांना पाठिंबा मिळू शकला नाही. जनतेचे लक्ष समाजक्रांतीवर केंद्रित करून त्यात तिची शक्ती वाया घालवण्यापेक्षा आधी राजकीय स्वातंत्र्यासाठी तिचा उपयोग करून घ्यावा, तसेच सामाजिक रूढींच्या प्रश्नावर लोकांची मने दुखवून राजकीय चळवळीत फूट पाडू नये, असे टिळकांना वाटे. ईश्वर आणि धर्म यांच्याविषयीचे आगरकरांचे विचार रा. गो. भांडारकर आणि न्यायमूर्ती रानडे यांसारख्या सुधारक व्यक्तींनाही पटत नसत. सुधारकातील लेखांविरुद्ध चहुबाजूंनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होऊ लागली. खुनाच्या धमक्या, प्रेतयात्रा काढणे इ. प्रकार झाले; परंतु 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार', या भूमिकेतून सामाजिक सुधारणांचा कडवा पुरस्कार त्यांनी आमरण चालू ठेवला. सुधारकातील लेखांतून त्यांचे समाजजीवनाच्या विविध अंगांचे सूक्ष्म निरीक्षण आणि सखोल चिंतन प्रत्ययास येते. स्त्रियांचा पोषाख, विधवांचे केशवपन, सोवळे-ओवळे, अंत्यविधी आणि अंत्यसंस्कार, हजामत, जोडे इ. विषय जसे त्यांत आहेत, तसेच देवतांची उत्पत्ती, मूर्तिपूजा, आत्म्याची मरणोत्तर स्थिती इत्यादींसारखे तात्त्विक आणि धर्माशी निकटचा संबंध असलेले विषयही आहेत. सामाजिक सुधारणा आणि कायदा यांचे संबंध काय असावेत, यासंबंधीची आपली भूमिका मांडण्यासाठी आणि समाजहितकारक कायद्यांच्या जोरदार पुरस्कारासाठी काही लेख लिहिले गेले आहेत; तर काही लेखांतून सामाजिक गुलामगिरीने जखडून गेलेल्या स्त्रियांच्या शिक्षणादी समस्यांविषयी मूलगामी विचार आलेले आहेत.

समाजचिंतन हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्थायीभाव असला, तरी राजकीय विचारांच्या जहालपणात ते टिळकांच्या बरोबरच होते. राजकीय हक्क आणि राजकीय स्वातंत्र्य यांची तीव्र जाणीव त्यांच्या लेखांतून स्पष्टपणे प्रतिबिंबित झालेली आहे. चिपळूणकर निवर्तल्यानंतर महाराष्ट्रात राजकीय विचारजागृती घडवून आणण्याचे काम 'केसरी'तून बाहेर पडेपर्यंत त्यांनीच केले. आपल्या वैचारिक लेखांनी मराठीतील निबंधसाहित्यात त्यांनी मोलाची भर घातली, पल्लेदार वाक्ये, मुद्देसूद प्रतिपादन, अन्वर्थक अलंकार आणि प्रासंगिक नर्मविनोद ही त्यांच्या लेखनशैलीची वैशिष्ट्ये. त्यांच्या 'कवि, काव्य, काव्यरति' आणि 'शेक्सपिअर, भवभूति व कालिदास' यांसारख्या साहित्यविषयक निबंधांनी आजच्या काही टीकाकारांचे लक्ष वेधून घेतले असून त्यांनी आगरकरांना साहित्यशास्त्रातील काही मूलभूत तत्त्वांचा शास्त्रीय पद्धतीने विचार करणारे विचारवंत मानले आहे. काव्य आणि संवेदना यांचा विशेष संबंध, काव्यातील सत्य आणि शास्त्रीय सत्य, काव्यातील करुणरस, कविमन आणि काव्यनिर्मितिप्रक्रिया इत्यादींसंबंधीचे त्यांचे विचार या दृष्टीने लक्षणीय ठरतात. त्यांचे ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत : विकारविलसित अथवा शेक्सपीअरकृत हॉम्लेट नाटकाचे भाषांतर (१८८३), डोंगरीच्या तुरुंगांत आमचे १०१ दिवस (१८८२), शेठ माधवदास रघुनाथदास व बाई धनकुवरबाई यांचे पुनर्विवाहचरित्र (१९०७), वाक्यमीमांसा आणि वाक्याचे पृथक्करण. विकारविलासिताच्या प्रदीर्घ प्रस्तावनेत परक्या भाषेतील नाट्यकृतींची मराठी भाषांतरे कशी करावी, यासंबंधीची मते त्यांनी मांडली आहेत. 'कोल्हापूर प्रकरणा'वरून १८८२ मध्ये डोंगरी येथे टिळकांसह कारावास भोगत असतानाचे त्यांचे अनुभव त्यांनी 'डोंगरीच्या तुरुंगांत'मध्ये खेळकर आणि विनोदी शैलीत सांगितले आहेत. मराठी वाक्याचे निरनिराळे अवयव आणि त्यांचे परस्परसंबंध यांचा तपशीलवार विचार त्यांनीच मराठीत प्रथम आणला. त्यांचे 'केसरी'तील निवडक निबंध (१८८७) आणि सुधारकातील वेचक लेख (निबंध संग्रह १८९५) प्रसिद्ध झाले आहेत. साहित्य अकादमीनेही त्यांचे काही लेख प्रसिद्ध केले आहेत.

१८९२ ते १८९५ या काळात ते पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्यही होते. अखेर १७ जून १८९५ रोजी वयाच्या अवघ्या ३९ व्या वर्षी दम्याच्या विकाराने त्यांचे पुणे येथे निधन झाले.

## जिवंतपणीच स्वत:ची प्रेतयात्रा पाहावी लागलेले समाजसुधारक

'लोकांना संतुष्ट राखण्यास स्नेह, दया, सौख्य आणि प्रसंग पडल्यास जानकी, यांचा त्याग करावा लागला तरी त्याबद्दल मला खेद होणार नाही' - उत्तमरामचरित्.

'लोकांच्या सुखासाठी मी कोणताही त्याग करण्यास तयार आहे,' असे एक वाक्य 'उत्तमरामचरिता'चे नायक श्रीराम उच्चरतात. हेच वाक्य 'आमचे डोंगरीतल्या तुरुंगातील १०१ दिवस' या पुस्तकाच्या सुरुवातीला आणि शेवटी आहे.

गोपाळ गणेश आगरकरांनी हे प्रखर बुद्धीप्रामाण्यवादी होते. मग आपल्या पुस्तकासाठी हेच वचन का निवडलं असेल?



**गोपाळ गणेश आगरकर पुण्यतिथी**

असा एक प्रश्न मनात सहज येतो. पण त्यांच्याबद्दल वाचल्यावर या वाक्याचा अर्थ उलगडतो. त्यांनी हे वाक्य केवळ आपल्या पुस्तकातच लिहिलंच नाही तर आयुष्यभर तेच जगले, याची जाणीव आपसूकच होते. अवघ्या ३९ वर्षांच्या आयुष्यात गोपाळ गणेश आगरकरांनी संपूर्ण महाराष्ट्र ढवळून टाकला आणि येणाऱ्या कित्येक पिढ्यांना देखील त्यांनी त्यांच्या तळपत्या लेखणीने विचार करायला भाग पाडलं. आजकालच्या कोणत्याही नेत्याचं भाषण घ्या, त्याची सुरुवात 'पुरोगामी महाराष्ट्र' या दोन शब्दांपासूनच होते. अनेक समाजसुधारक आणि विचारवंतांच्या अथक प्रयत्नांमुळे मराठी समाज हा प्रबोधनाच्या वाटेवर आला. त्यापैकी एक गोपाळ गणेश आगरकर होते. ज्या समाजाच्या उद्धाराची तळमळ त्यांच्या प्रत्येक कृतीतच नाही, तर श्वासाश्वासांत होती त्याच समाजाकडून काढण्यात आलेली प्रेतयात्रा त्यांना जिवंतपणीच पाहावी लागली होती.

### पुण्याचे 'फर्ग्युसन' व सांगलीच्या विलिंग्डनची स्थापना

त्यांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली आणि २ जानेवारी १८८५ ला फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. मुंबई प्रांताचे तत्कालीन गव्हर्नर सर जेम्स फर्ग्युसन यांचं नाव या कॉलेजला देण्यात आलं होतं. १९१९ ला सांगलीमध्ये डेक्कन एज्युकेशन सोसायटीने कॉलेज काढलं. त्याला त्यांनी 'विलिंग्डन कॉलेज' असं नाव दिलं. त्यावेळी मुंबई प्रांताचे गव्हर्नर लॉर्ड विलिंग्डन हे होते.

# जीपीएमटीच्या केंब्रिज स्कूलमध्ये 'फादर्स डे' साजरा

**मिरज : हॅलो प्रभात**

येथील संयोगिता पाटील केंब्रिज स्कूल अँड ज्युनियर कॉलेजमध्ये फादर्स डे उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांच्या पालकांना निमंत्रित करण्यात आले होते. सर्वप्रथम भेट कार्ड व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या वडिलांच्या बद्दल असलेल्या कृतज्ञतेच्या मनातील भावना व्यक्त केल्या. त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या वडिलांनी मनोगतात पृथ्वीराजबाबा पाटील यांच्या केंब्रिज स्कूलने आम्हाला फादर्स डे ला प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करुन आमच्या पाल्यांवर कौटुंबिक




मूल्यांचे संस्कार केले. शाळेत गुणवत्तायुक्त शिक्षण देताना चांगले संस्कार केले जातात. ही पालकांना दिलासा देणारी बाब आहे अशा भावना व्यक्त केल्या. वडिलांचा नेहमी आदर करावा, हे एका कथेतून सांगण्याचा प्रयत्न केला. नेहमी समाधानी रहा, देवाने जे काही आपल्याला दिलेले आहे त्याचा वापर करा. चांगला माणूस बना, माणुसकी टिकवा ,गरजू लोकांना मदत करा, सर्वांना प्रेम द्या. आई-वडील आणि शिक्षक यांचा नेहमी आदर करा. वडिलांचे चरित्र समजून घ्या, त्यांचं वागणं, बोलणं, राहणं, त्यांचे व्यक्तिमत्व प्रत्येक मुलांनी समजून घ्या या शब्दात मार्गदर्शन केले.

त्यानंतर अधीक्षिका क्रिस्टीना मॅडम यांनी- मुलांना चांगले शिक्षण घ्या आणि चांगले वडील बना आयुष्यात प्रत्येकाचा आदर करा असे सांगितले. स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीदेवी कुल्लोळी मॅडम यांनी देव हा इतर कुठेही नसून तुमच्या आई-वडिलांच्या मध्ये आहे, त्यांचा आदर करा .आपल्या आई-वडिलांना वृद्धाश्रमात ठेवणे ही आपली संस्कृती नाही. त्यांची काळजी घ्या. पालकांनी सुद्धा आपल्या मुलांसोबत आपल्या भावना व्यक्त करा असे त्यांनी सांगितले.

# राहुरीत जनावरांच्या बाजाराला उत्तम प्रतिसाद

**राहुरी : हॅलो प्रभात**

कृषि उत्पन्न बाजार समिती राहुरी मुख्यालय विस्तारीकरण आवारात सुतगिरणी शेजारी जनावरांच्या बाजाराचा रविवारी शुभारंभ झाला. पहिल्याच



बाजारास शेतकरी, व्यापारी यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे, प्रेरणा परिवाराचे अध्यक्ष सुरेश वाबळे, युवा नेते हर्ष तनपुरे व बाजार समिती व तनपुरे कारखाना संचालक मंडळाच्या उपस्थित शुभारंभ सोहळा पार पडला. राहुरीत हा बाजार सुरू झाल्याने पशुपालक शेतकरी व व्यापारी यांना जनावरे खरेदी-विक्री करण्यासाठी इतर ठिकाणी बाजारात नेण्याची परवड आता थांबणार आहे. जनावरांच्या बाजारासाठी भव्य व सुसज्ज प्रागंण,जनावरे उतरविण्यासाठी प्रशस्त धक्का, शेड जनावरांना पिण्याचे पाण्याची स्वतंत्र व्यवस्था,जनावरे धुण्यासाठी पाण्याची व्यवस्था तसेच जनावरे विक्रीसाठी आणणाऱ्या शेतकरी, व्यापाऱ्यांसाठी दावणीसाठी व्यवस्था, जनावरे घेऊन येणाऱ्या वाहन धारकांना स्वतंत्र पार्किंग व्यवस्था केल्याने सर्व पशुपालक शेतकरी व व्यापारी यांनी समाधान व्यक्त केले. सचिव भिकादास जरे यांनी सर्वांचे आभार मानले.

# कुर्डूवाडी येथे स्वामी समर्थांच्या पालखीचे आगमन

**कुर्डूवाडी : अंकुश आतकर**

कुर्डूवाडी येथे श्री.स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ, अक्कलकोट यांच्या येथे आज मंगळवार (ता. १७) सायंकाळी ५ वाजता श्री स्वामी समर्थ महाराज अक्कलकोट पालखी पादुकांचे आगमन होणार आहे.



माढ्याच्या तहसीलदार शिल्पा ठोकडे व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख धनंजय डिकोळे, श्री स्वामी समर्थ बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष दुर्गेश सोनवर, शिवप्रतिष्ठान मंडळाचे संस्थापक संजय टोणपे यांच्यासह मान्यवर व नागरिक स्वागतासाठी पंढरपूर रस्त्यावर उपस्थित राहणार आहेत. पटेल चौक येथे संध्याकाळी सात वाजता ह. भ. प. सुधाकर इंगळे महाराज यांचे प्रवचन झाल्यानंतर माजी आमदार संजय शिंदे व त्यांच्या पत्नी सविता शिंदे यांच्या हस्ते आरती होणार आहे. सर्व भाविकांना महाप्रसादाचे आयोजन केले आहे. बुधवारी सकाळी विशाल गावडे, त्यांच्या पत्नी अंजली गावडे व आकाश पांढरे, त्यांच्या पत्नी नम्रता पांढरे यांच्या हस्ते उत्तरपूजा व आरती होणार आहे. या सर्व कार्यक्रमांसाठी समर्थ ग्रुप, प्रणीत पटेल चौक गणेश मंडळ व शिवप्रतिष्ठान क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे पदाधिकारी यांच्यासह अनेक स्वामी भक्त परिश्रम घेत आहेत.

# संपादकीय

## महाराष्ट्रासाठी यंदाचा पाऊस कृषी, उद्योग सिंचनासाठी मोठा दिलासा देणारा ठरणार!

महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण जरी जास्त असले तरी, पावसाचे वितरण समान न राहता काही ठिकाणी अतिवृष्टी होऊ शकते. अशा परिस्थितीत प्रशासनाने सतर्क राहून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे हवामान विभागाने सूचित केले आहे. पाऊस दरवर्षी नेमाने येतो आणि येताना आनंदाच्या नव्या आशा-आकांक्षा घेऊन येतो. परंतु माणसाकडूनही या पावसाच्या काही अपेक्षा असताच की, पर्यावरणाचे रक्षण आणि हिरवळीची जपवणूक करण्याची अपेक्षा या पावसाचीही असते. पावसाची अपेक्षा पूर्ण केल्यास त्या बदल्यात पाऊस इथल्या जीवांना पाणी असलेल्या जीवनाचे दान भरभरून देतो. त्याचे हे दान घेताना या पावसाच्या पदरात माणसांनी हिरवाईचं दानही भरभरून टाकावे, समाधानकारक पाऊस असा शब्दप्रयोग माणसांकडून नेहमीच केला जातो, अशावेळी पावसाचेही 'समाधान' करण्याची जबाबदारी आपल्यावर येते, ही जबाबदारी माणसांनी विसरू नये.

महाराष्ट्रात २०२५ च्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे, असे भारतीय हवामान विभागाने जाहीर केले आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत राज्यातील सर्व विभागांमध्ये सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे. विशेषत: मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता वर्तविण्यात आली. त्यामुळे नेहमीच पावसाच्या प्रतिक्षेत असलेल्या या अवर्षणप्रवण भागातील शेतकरी यंदा आनंदात आहेत. सध्याच्या हवामानाच्या स्थितीनुसार १५ जूनपासून महाराष्ट्रात मान्सून सक्रिय झाला आहे. विदर्भात १५ ते २० जून या कालावधीत मुसळधार पावसाची शक्यता असल्याने या भागातील पिकांना त्याचा फायदाच होणार आहे तर मराठवाडा, कोकण आणि मध्य महाराष्ट्रातही मुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे पूरसदृश्य स्थितीचा धोका असला तरी यंदाचा पाऊस उत्साह आणि आनंदाने भरलेला आहे.

महाराष्ट्रात खरीप आणि रब्बी पिकांसाठी पावसाचे पाणी महत्त्वाचे आहे. धान, ज्वारी, बाजरी, कापूस, सोयाबीन यांसारखी पिके पावसावर अवलंबून असल्याने यंदा शेती उत्पादन आणि उत्पन्नासाठीही ही चांगली सुरुवात आहे. महाराष्ट्रात मराठवाड्यातील धाराशिव, लातूर, सोलापूर, बीड भागातील कमी पर्जन्यमानामुळे दरवर्षी उन्हाळ्याच्या आधीच या भागात टँकर सुरू झालेले असतात पण यंदा या पट्ट्यातही जोरदार पाऊस झाल्याने जमिनीत पाणी झिरपण्याचे प्रमाण वाढल्यामुळे या पाण्यावर रब्बीचा हंगामही निभावला जाईल. सोबतच पुढील वर्षी टँकरचे प्रमाणही कमी होण्याची चिन्हे आहेत. ओला दुष्काळ परवडला परंतु कोरडा दुष्काळ नकोच, ओल्या दुष्काळात जनावराच्या चारा आणि पाण्याचा प्रश्न निर्माण होत नसल्याने जनावरे जगवताना शेतकऱ्यांचे हाल होत नाहीत, दरवर्षी कोरड्या दुष्काळसदृश्य स्थितीमुळे उन्हाळ्यात मराठवाड्यातील चारा छावण्यांची वाढलेली संख्या चिंताजनक असते.

येत्या वर्षी हे चित्र कमी होण्याची शक्यता आहे. यंदाच्या पावसामुळे मराठवाड्यातील कोरड्या दुष्काळसदृश्य स्थितीची शक्यता टळली आहे. मागील चार दिवसांच्या पावसामुळे पुणे ग्रामीण आणि मराठवाड्यातील तलाव, विहिरींचे जलसाठे भरत आले आहेत. यामुळे पिण्याच्या पाण्यासाठीची वणवण थांबणार आहे. कोयना, उजनी, जायकवाडी यांसारख्या धरण क्षेत्रातील पावसामुळे वीज प्रकल्पांसाठीही पूरक असा पाऊस यंदा होण्याची सुचिन्हे आहेत. मुंबई, ठाण्यासारख्या शहरांना पाणीपुरवठा करणाऱ्या भातसा, तानसा तलाव क्षेत्रातही यंदा उत्तम पाऊस होण्याची शक्यता आहे. पावसाचे असेच सातत्य जुलैपर्यंत राहिल्यास शहरांसाठी पाण्याचा प्रश्न लवकर मार्गी लागेल. सह्याद्रीच्या पायथ्याशी असलेले जंगल, वनस्पती आणि जैवविविधता टिकून राहाण्यास आणि नैसर्गिक संतुलनासाठी चांगला पाऊस आवश्यकच आहे.

पावसाचे पाणी जमिनीत झिरपून भूजल पातळीत झालेल्या वाढीमुळे शेती आणि शेतीपूरक व्यवसाय म्हणजेच पशुपालनासाठी हे झिरपलेले पाणी पावसाळ्यानंतरही गरजेचे ठरणार आहे. राज्यातील विहिरी आणि बोअरवेलमधील पाण्याची पातळी समाधानकारक राहाण्यास मदत होणार आहे. बदलत्या ऋतूचक्रामुळे पावसाळाही लांबला आहे. परिणामी दिवाळीपर्यंत पावसाची रिपरिप सुरूच असते. यंदा मात्र मे महिन्यातच सुरू झालेल्या पावसाळ्यामुळे यंदाचा पाऊस सप्टेंबरपर्यंत पाच महिन्यापर्यंत कोसळण्याचा अंदाज आहे. या पावसाचा उत्साह पाहता जुलै अखेपर्यंत महाराष्ट्राचा पाणीप्रश्न मिटणार आहे. पाण्याची उपलब्धता वाढल्याने उद्योगांना, विशेषत: अन्न प्रक्रिया आणि कृषी आधारित उद्योगांना फायदा होणार आहे. कोकण, मराठवाडा, विदर्भासह पश्चिम महाराष्ट्रातही यंदा पर्जन्यमान उत्तम असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाल्यानंतर माळशेज, खंडाळा आणि सह्याद्रीच्या रांगांमध्ये वर्षापर्यटनाच्या उत्साहाला उधाण आले आहे.

एव्हाना पाऊस महाराष्ट्रात सर्वदूर स्थिरावलेला आहे. यंदाच्या वर्षी समाधानकारक पाऊस होणार असल्याची आनंदवार्ता आहे. महाराष्ट्राच्या भौगोलिक स्थितीमुळे अपवाद वगळता राज्यावर वरुणराजाची कृपा राहिली आहे. यंदा पावसाळा मे महिन्यातच सुरू झाल्यानंतर ऐन जूनच्या पहिल्या आठवड्यात विश्रांती घेतल्याने शेतकरी गोंधळलेला होता. मात्र आता पाऊस स्थिरावल्यामुळे जमीन आणि जीवांनाही जीवनाचे दान देणाऱ्या पावसाचे स्वागत व्हायला हवे. महाराष्ट्रासाठी यंदाचा पाऊस कृषी, उद्योग, सिंचनासाठी दिलासा देणारा ठरणार आहे.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक
हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत) ■ **Email : ehelloprabhat@gmail.com**

■ सह संपादक : सार्थक पाटील ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

# कमलाबाई विरकर पुरस्काराने सन्मानित

**म्हसवड : हॅलो प्रभात**
विरकरवाडी ता.माण येथील श्रीमती कमलाबाई भिकू विरकर यांना नुकताच अहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणिक विकास ट्रस्टच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्त आदर्श माता



पुरस्काराने नुकतेच गौरविण्यात आले. माजी आ. रामहरी रुपनवर व प्रविण काकडे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.श्रीमती कमळाबाई ह्या म्हसवड नगरपरिषदेच्या माजी नगरसेविका असून त्यांनी महिला सबलीकरणासाठी मोठे योगदान दिले आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व नातेवाईक, आप्तेष्ट, सर्वच स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

## ▪ संमिश्र ▪

## जिल्हा नियोजन समिती कार्यकारी सदस्यपदी संग्राम देशमुख



**कडेपूर : हॅलो प्रभात**
जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्राम देशमुख यांची सांगली जिल्हा नियोजन समिती सदस्यपदी निवड झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या शिफारशीनुसार जिल्हा नियोजन समितीवर सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली. संग्राम देशमुख यांना सांगली जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या कामकाजाचा अनुभव असून त्यांनी पंचायत समिती सदस्य, जिल्हा बँक उपाध्यक्ष, भाजपा पलूस कडेगाव विधानसभा प्रमुख, शूटिंग बॉल असोसिएशन अध्यक्ष ही पदे भूषवली असून त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली असल्याने महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपा प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण, भाजपा सांगली जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांना दुसऱ्यांदा जिल्हा नियोजन समिती कार्यकारी सदस्यपदी संधी मिळाली आहे. निवडीनंतर चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते संग्रदेशमुख यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शेखर इनामदार, विक्रम पाटील, बाळासाहेब यादव, हिंदुराव यादव, संदीप गायकवाड उपस्थित होते.

## मनसे सर्वसामान्यांच्या पाठीशी नेहमी : अभिजित राऊत



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**
महाराष्ट्र नवनिर्माण सेना गरजवंतांना वेळोवेळी मदत करतात व अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी उभे असल्याचे विद्यार्थी सेना जिल्हा अध्यक्ष अभिजित राऊत यांनी प्रतिपादन केले. ते येथील जोड्या बागवान सत्कार प्रसंगी बोलत होते.अध्यक्षस्थानी मनसे परिवहन सेना जिल्हा अध्यक्ष विजय कारजगार होते. जोया बागवान यांची इस्रो अहमदाबाद येथे इंट्रनशिप आणि संशोधन करण्यासाठी सेटेलाईट डेटा विभागात निवड झाली. याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना च्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी मनसे शहराध्यक्ष अजिंक्य शिंदे, विश्वजीत वाडकर,श्रीकांत राऊत व पदाधिकारी यांच्यासह बागवान कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.

## फ्लिक्सबसचा पश्चिम भारतात सेवा विस्तार

**मुंबई : हॅलो प्रभात**
प्रवास तंत्रज्ञान आणि परवडणाऱ्या वाहतुकीत जागतिक आघाडीवर असलेल्या फ्लिक्सबसने आंतरराज्यीय बस नेटवर्कचा विस्तार करताना मुंबई आणि इंदूरला जोडणारा एक नवीन इंटरसिटी मार्ग सुरू करण्याची घोषणा केली आहे. फ्लिक्सबसच्या नेटवर्क विस्तारात हा एक महत्त्वपूर्ण टप्पा असून याद्वारे कंपनीची पश्चिम भारतात उपस्थिती मजबूत झाली आहे. या नवीन सुविधेद्वारे प्रदेशातील सर्वात लोकप्रिय प्रवास मार्गांवर आधुनिक सुविधा, सुरक्षितता आणि परवडणारी क्षमता यांचे अद्वितीय संयोजन प्रवाशांना मिळणार आहे. या नवीन मुंबई-इंदूर मार्गावर कंपनी मर्यादित कालावधीसाठी फक्त ३९९ रुपयांपासून सेवा देत आहे.

## अबंप येथे कृषी कन्यांचे स्वागत



**अबंप : किशोर जासूद**
येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कोल्हापूर येथील राजर्षी छ. शाहू महाराज कृषी महाविद्यालयाच्या चौथ्या वर्षातील विद्यार्थीनी कृषी कन्या म्हणून ग्रामीण (कृषी) जागरूकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम पार पडला. या कृषी कन्यांचे ग्रामपंचायत पदाधिकार्यांनी स्वागत केले कृषी कन्या सहा महिने गावात राहून शेतकऱ्यांच्या अडचणी व त्यांचे जीवनमान, गावातील पीक पद्धती यांचा अभ्यास करतील. तसेच विविध प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके दाखवणार आहेत.

## पेटीएम मनीकडून प्रगत साधनांची घोषणा

**मुंबई : हॅलो प्रभात**
तंत्रज्ञानाधिष्ठित दृष्टिकोनातून संपत्ती व्यवस्थापन व इक्विटी गुंतवणूक सुलभ करणा-या पेटीएम मनीने रिटेल फ्युचर्स आणि ऑप्शन्स (एफ अँड ओ) ट्रेडर्ससाठी प्रगत ट्रेडिंग टूल्सचे सादरीकरण केले आहे.
नवीन वैशिष्ट्यांमध्ये ऑप्शन्स स्कॅलपर, चार्टवरून थेट ट्रेडिंग (चार्टआयक्यूद्वारे समर्थित), ऑप्शन चेनमधून बास्केट ऑर्डर, फक्त ९.७५% व्याजदराने पे लेटर (एमटीएफ), आणि ट्रेडिंग आयडिया ङ्ख हे पेटीएम मनी सेबी-नोंदणीकृत संशोधन विश्लेषक असल्यामुळे शक्य झाले आहे. हे सर्व टूल्स सर्व पातळीच्या ट्रेडर्ससाठी सोयीस्कर आणि सुलभ इंटरफेसद्वारे उपलब्ध आहेत.

# शासकीय रुग्णालयास प्रा.शरद पाटील यांचे नाव देण्याचे आश्वासन

**मिरज : हॅलो प्रभात**
सर्वसामान्यांचे कैवारी तसेच तत्कालीन महाराष्ट्र विधानसभा सभा आणि विधानपरिषदेचे सदस्य दिवंगत लोकनेते माजी आमदार प्रा. शरद पाटील यांचे नाव येथील शासकीय सर्वोपचार रुग्णालयास (सिव्हिल हॉस्पिटल) देण्याची मागणी जनता दलाचे एका शिष्टमंडळाद्वारे राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा सांगलीचे पालक मंत्री नामदार चंद्रकांत पाटील यांची मिरज येथे भेट घेऊन केली.



त्यावेळी ना. चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिवंगत माजी आमदार प्रा. शरद पाटील यांचे सामाजिक आणि राजकीय कारकीर्द विचारात घेऊन त्यांचा मरणोपरांत त्यांचा यथोचित सन्मान व्हावा यासाठी त्यांचे नाव मिरज येथील शासकीय सर्वोपचार रुग्णालयास (सिव्हील हॉस्पिटल) त्यांचे नाव देण्याबाबत आवश्यक ती उचित कार्यवाही करणेत येईल असे आश्वासन दिले.

यावेळी दिवंगत माजी आमदार प्रा.शरद पाटील यांचे नातू सर्वश्री प्रणव पाटील, वितराग देवर्षी, संघटन मंत्री मकरंद देशपांडे, जनसुराज्य पक्षाचे सुमित कदम, प्रदेश जनता दलाचे सचिव प्रेमचंद पांड्याजी,
जिल्हाध्यक्ष फैय्याज झारी, शशिकांत गायकवाड,डॉ. जयपाल चौगुले, संजय ऐनापुरे, अशोकराव पाटील (कोकळेकर), प्राचार्य एस.ए.पाटील, प्रा. महावीर पाचोरे, राजू ऑडियापन, कुमार कोलप,अहिंसक धोतरे, यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

# माणिकराव पाटील यांचा आज नागरी सत्कार

**बोरगाव : विक्रम देशमुख**
बोरगाव (ता.वाळवा) येथील राजारामबापू सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी माणिकराव शामराव पाटील यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंतराव पाटील यांच्या हस्ते त्यांचा नागरी सत्कार करण्यात येणार आहे. हा नागरी सत्कार बुधवार दि १८जून रोजी सायंकाळी ६ वाजता गणेश मल्टीपर्पज हॉल, बोरगाव या ठिकाणी होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्य शिखर बँकेचे माजी अध्यक्ष माणिकराव पाटील हे असून राजारामबापू कारखान्याचे अध्यक्ष प्रतिक पाटील, शामराव पाटील, देवराज पाटील, विजय यादव, विनायक पाटील, यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे. या कार्यक्रमाचे संयोजन सत्कार समिती करत आहे.



# पीएनबी मेटलाइफने १,०४१ कोटींचा बोनस केला जाहीर

**मुंबई : हॅलो प्रभात**
भारतातील आघाडीच्या जीवन विमा कंपन्यांपैकी एक असलेल्या पीएनबी मेटलाइफ इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी विक्रमी बोनस जाहीर केला आहे. यंदाचा बोनस रु. १,०४१.४५ कोटी इतका असून, तो मागील वर्षी जाहीर करण्यात आलेल्या रु. ९३० कोटींच्या बोनसपेक्षा १२% अधिक आहे. या घोषणेमुळे ५.६८ लाखांहून अधिक पात्र सहभागी पॉलिसीधारकांना लाभ होणार आहे. पीएनबी मेटलाइफने सलग २२ वर्षांपासून ग्राहकांच्या हिताला पूरक आणि स्थिर परतावा देणारा बोनस जाहीर करत आर्थिक सुरक्षिततेच्या आपल्या वचनाची पूर्तता केली आहे.

## डेटॉल फ्रेश देते १२ तास ताजेपणा

**मुंबई : हॅलो प्रभात**
भारतातील सर्वात विश्वासार्ह स्वच्छता ब्रँडपैकी एक असलेल्या डेटॉलने त्यांच्या प्रसिद्ध कोलोन फ्रेशब आणि लाइम फ्रेश साबण प्रकारांमध्ये १२ तासांचा ताजेपणा देऊन वैयक्तिक काळजी घेण्याची वचनबद्धता वाढवली आहे.
डेटॉल फ्रेश ९९.९% दुर्गंधी निर्माण करणारे जंतूभ काढून टाकून आणि तुम्हाला १२ तास




ताजेपणा देते तसेच ही दररोजची अस्वस्थता दूर करते,
जेणेकरून लोकं आत्म विश्वासाने आणि कोणत्याही संधीचा फायदा घेण्यास तयार असतील.

# नाटेगांव सरपंचपदी गणेश मोरे यांची निवड

**कोपरगांव : हॅलो प्रभात**
तालुक्यातील नाटेगांव ग्राम पंचायतीच्या सरपंचपदी कोल्हे गटाचे गणेश आप्पासाहेब मोरे यांची बिनविरोध निवड झाली.
त्याबददल त्यांचे संजीवनी उद्योग समुहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, संजीवनी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष नितीन कोल्हे, कोल्हे कारखान्याचे अध्यक्ष विवेक कोल्हे यांनी अभिनंदन केले आहे. निवडणुक निर्णय अधिकारी म्हणून मच्छिंद्र



पोकळे व सहायक म्हणुन ग्रामसेवक सिध्दार्थ काळे यांनी काम पाहिले.
गणेश मोरे यांच्या नावाची सुचना जयवंत बाबासाहेब मोरे यांनी केली. नवनिर्वाचित सरपंच गणेश आप्पासाहेब मोरे यांचा यावेळी सत्कार करण्यांत आला. सत्कारास उत्तर देतांना ते म्हणाले की, युवानेते विवेक कोल्हे यांच्या मार्गदर्शनांखाली नाटेगांव ग्रामपंचायत अंतर्गत विविध जनविकासाच्या योजना राबवुन गांवचा कारभार आदर्श करण्यांवर भर देऊ.
याप्रसंगी कोल्हे सहकारी कारखान्याचे संचालक त्रंबकराव सरोदे, साहेबराव रोहोम, डी. पी. मोरे, रामदास मोरे, डॉ गोरक्षनाथ मोरे, राजेंद्र मोरे,
नारायण मोरे यांच्यासह विविध संस्थांचे आजी माजी पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, कार्यकर्ते उपस्थित होते. शेवटी ग्रामसेवक सिध्दार्थ काळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## श्री क्षेत्र आळंदीत वारकरी दिंड्या दाखल
### वारकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासन सज्ज



**पुणे : सोमनाथ साळुंके**
श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखी सोहळ्यासाठी राज्यातील कानाकोपऱ्यातून वारकऱ्यांच्या दिंड्या दाखल झाल्या असून माऊलींच्या दर्शनासाठी भाविक भक्तांची या ठिकाणी मांदियाळी दिसून येत आहे.त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून प्रशासन सज्ज झाले आहे.
श्री क्षेत्र आळंदी येथून गुरुवार(दि.१९) रोजी माऊली संजीवनी समाधी असलेल्या मंदिरातून पालखीचे पुण्याच्या दिशेने प्रस्थान होणार आहे. त्यामुळे मंदिराच्या आवारात साफसफाई करण्यात आली असून मंदिरास भव्य असे फुलांचे तोरण उभारल्यामुळे करण्यात आलेली फुलांची सजावट ही भाविकांना आकर्षित करत होती.याबरोबरच परिसरात काही प्रकारच्या अनुचित घटना घडू नये.
या उद्देशाने पिंपरीमचिंचवड शहर पोलिस आयुक्त कार्यालयाच्या वतीने व आळंदी, दिघी पोलिस स्टेशन अंतर्गत मंदिर परिसर आवारात व इतरत्र जवळपास अंदाजे तीन ते साडेतीन हजार पोलिस तैनात करण्यात आल्याने या भागाला सध्याच्या परिस्थितीत छावणीचे स्वरूप प्राप्त झाले आहे.याबरोबरच या ठिकाणी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्तासह वारकरी दिंड्या परिसरात दाखल झाल्या असून वारकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध होण्याचे दृष्टीने आळंदी नगरपरिषद,पिंपरी चिंचवड पालिकेच्या वतीने टँकरची व्यवस्था करण्यात आली आहे.
श्रींच्या पालखीचे प्रस्थान दोन दिवसांनी पुण्याच्या दिशेने होणार असल्यामुळे वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर उत्साहाचे वातावरण दिसून येत असून पालखी सोहळा व्यवस्थित पार पडण्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज विश्वस्त कमिटी आळंदी यांच्या वतीने नियोजन करण्यात आले आहे. तर यावर्षीच्या पालखीच्या रथाचा मान राजा-प्रधान या बैलजोडीस मिळाला आहे

# ‘राष्ट्रवादी’तर्फे आज मेळाव्याचे आयोजन
## आ.जयंत पाटील,प्रा.लक्ष्मणराव ढोबळे मार्गदर्शन करणार

**सांगली : हॅलो प्रभात**
राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे बुधवारी (ता. १८) कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन केले आहे. सांगलीतील विष्णुदास भावे नाट्य मंदिरात सकाळी ११.३० वाजता मेळावा होईल.
प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील मेळाव्याचे अध्यक्ष असून माजी मंत्री प्रा. लक्ष्मणराव ढोबळे मेळाव्यास मार्गदर्शन करणार आहेत. पक्षाच्या सामाजिक न्याय विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष जयदेव गायकवाड, प्रदेशाध्यक्ष पंडित कांबळे यांची या मेळाव्यास विशेष उपस्थित राहतील. मेळाव्यास कार्यकर्त्यांनी





मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन सामाजिक न्याय विभागाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष कुमार लोंढे व शहर जिल्हाध्यक्ष उत्तमराव कांबळे यांनी केले आहे.
या मेळाव्यास आमदार अरुण लाड, आमदार रोहित पाटील, माजी आमदार मानसिंगराव नाईक, माजी आमदार सुमन पाटील, अनिता सगरे, मिरज तालुक्याचे नेते मनोज शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष देवराज पाटील,
शहर जिल्हाध्यक्ष संजय बजाज यांच्यासह पक्षाचे प्रमुख नेते, पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.
सध्याच्या मुंबई आणि दिल्लीच्या सरकारांना मागासवर्गीय समाजाच्या प्रश्नांची फिकीर नाही. मागासवर्गीय समाजाच्या समोर अनेक प्रश्न आ वासून उभा आहेत. आम्ही या मेळाव्याच्या माध्यमातून जिल्ह्यातील मागासवर्गीय समाजाला संघटीत करून त्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहोत, असे संयोजकांनी स्पष्ट केले.

# मेकॅनिकल इंजिनिअरिंग - एक अचूक राष्ट्रनिर्मितीचे इंजिन

**दै. हॅलो प्रभात**
प्रत्येक वर्षी आपल्या देशात हजारो विद्यार्थी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या शाखांसह बारावी उत्तीर्ण होतात. या यशानंतर विद्यार्थ्यांसमोर उभे राहते सर्वात मोठे आणि जबाबदारीचे टप्पे - योग्य करिअर निवडीचे. प्रत्येक जण आपल्या स्वप्नांचे आभाळ गाठण्यासाठी, सुरक्षित आणि उज्वल भविष्य घडवण्यासाठी अनेक करिअर मार्गांचा शोध घेत असतो. अनेक विद्यार्थी एक अत्यंत महत्वाचा, बहु-आयामी, आणि दीर्घकालीन संधी असणारा पर्याय दुर्लक्षित करतात - तो म्हणजे मेकॅनिकल इंजिनिअरिंग. मेकॅनिकल इंजिनिअरिंग ही केवळ यंत्रांची शाखा नाही. ही शाखा म्हणजे चालत्या फिरत्या जगाची धुरा आहे. तुम्ही बस, कार, रेल्वे, मेट्रो, जहाज, विमान, स्मार्ट फोन, रेफ्रिजरेटर, औद्योगिक यंत्रणा, विद्युत निर्मिती, टर्बाइन्स, रॉकेट्स - यांपैकी कोणतीही गोष्ट बघा, त्यामागे एका मेकॅनिकल इंजिनिअरचे कल्पक डोके, चिकाटीने केलेली रचना आणि कठोर परिश्रम लपलेले असतात. आज आपण ज्या आधुनिक जीवनशैलीचा आनंद घेत आहोत, ती शक्य झाली आहे ती मेकॅनिकल इंजिनिअर्सच्या मुळेच. ही शाखा देशाच्या प्रगतीचा गतीशिल इंजिन आहे. वंदे भारत ट्रेन असो, चांद्रयान मिशन असो, गगनयान यान असो, किंवा स्वदेशी उत्पादने - या साऱ्यांमध्ये मेकॅनिकल इंजिनिअर्सचा अमूल्य वाटा आहे. मेकॅनिकल इंजिनिअरिंग म्हणजे देशाच्या उद्योगांना चालना देणारी शक्ती, 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' सारख्या राष्ट्रीय मोहिमांचे हृदय आहे. ऊर्जा, वाहतूक, उत्पादन, संरक्षण, अवकाश, पर्यावरण, आणि आरोग्य क्षेत्रांमध्ये मेकॅनिकल इंजिनिअर्स सतत नवे शोध, नवे डिझाईन्स आणि नवे उपाय निर्माण करीत आहेत.
मेकॅनिकल इंजिनिअरिंग ही ‘सर्व अभियांत्रिकी शाखांची जननी‘ म्हणून ओळखली जाते. आजच्या युगातील बहुतेक तंत्रज्ञान याच शाखेवर आधारित आहे. विमान, कार, उर्जा प्रकल्प, वैद्यकीय उपकरणे, फॅक्टरीतील रोबोट्स यामागे मेकॅनिकल इंजिनिअर्स असतात. संगणक इंजिनिअरिंग किंवा अन्य शाखांसारखे मर्यादित उद्योगांपुरते न राहता, मेकॅनिकल इंजिनिअर्सना सर्वच क्षेत्रांमध्ये संधी मिळतात आणि त्यांची गरज नेहमीच राहते. या शाखेमध्ये तुम्हाला डिझाईन, उत्पादन, थर्मल सायन्स, फ्लुइड मेकॅनिक्स, ऑटोमेशन, रोबोटिक्स, आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यांसारख्या अत्याधुनिक कौशल्यांची प्रत्यक्षात प्रशिक्षण मिळते. याचबरोबर समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि नेतृत्व कौशल्ये विकसित होतात, ज्यामुळे तुम्ही सर्वच क्षेत्रांमध्ये सहज फिट बसता आणि तुम्हाला देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध होतात.

**करिअरच्या अमर्याद संधी**

मेकॅनिकल इंजिनिअरिंग ही अत्यंत विस्तृत करिअर पर्याय देणारी शाखा आहे. पदवी घेतल्यानंतर तुम्ही खालील क्षेत्रांमध्ये काम करू शकता:
* ऑटोमोबाईल इंडस्ट्री: कार, दुचाकी, इलेक्ट्रिक वाहनांची रचना आणि उत्पादन.
* एअरोस्पेस क्षेत्र: विमाने, उपग्रह, आणि रॉकेट्सची निर्मिती.
* ऊर्जा क्षेत्र: थर्मल, न्यूक्लिअर, सौर आणि पवन ऊर्जा प्रकल्प.
* मॅन्युफॅक्चरिंग आणि ऑटोमेशन: रोबोटिक्स, मशीनिंग, औद्योगिक ऑटोमेशन.
* मेकॅट्रॉनिक्स व रोबोटिक्स: बुद्धिमान यंत्रांची रचना.
* HVAC व रेफ्रिजरेशन: वातानुकूलन आणि थंडकरण यंत्रणा.
* शासकीय नोकऱ्या: भारतीय रेल्वे,

तुम्ही भारतात किंवा परदेशात उच्च शिक्षण (M.Tech, MBA, पीएचडी) करू शकता आणि रोबोटिक्स, नॅनो टेक्नॉलॉजी, ३D प्रिंटिंग, इलेक्ट्रिक वाहने, एअरोस्पेस इंजिनिअरिंग किंवा सस्टेनेबल एनर्जीमध्ये विशेषज्ञ होऊ शकता. तसेच, अनेक मेकॅनिकल इंजिनिअर्स प्रोजेक्ट मॅनेजमेंट, डेटा ॲनालिटिक्स किंवा स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याकडेही वळू शकता.

उद्योजकतेची वाढती संधी

उद्योजकतेच्या दृष्टीनेही मेकॅनिकल इंजिनिअर्सकडे स्टार्टअप्स सुरू करण्याची अभूतपूर्व क्षमता आहे. एत रिपेअर वर्कशॉप्स, सौर ऊर्जा उपकरणे, कृषी उपकरणे, रोबोटिक्स सोल्युशन्स, ३D प्रिंटिंग सेवा, आणि ऊर्जा कार्यक्षम यंत्रसामग्री यांसारख्या क्षेत्रांमध्ये आपला स्वतःचा व्यवसाय सुरू करून अनेक जण यशस्वी झाले आहेत.
मेकॅनिकल इंजिनिअरिंग ही फक्त एक पदवी नाही, ती एक रोमांचक आणि सर्जनशील प्रवासाची सुरुवात आहे.
तुम्हाला कधीही फक्त संगणकासमोर बसून काम करायचे नसेल, तर ही शाखा तुम्हाला प्रत्यक्ष यंत्रांवर, उत्पादनात, डिझाईनमध्ये आणि नेतृत्वामध्ये घडवते.
प्रिय विद्यार्थ्यांनो आणि पालकांनो, जर तुम्हाला यंत्रांची रचना आवडते, नवीन गोष्टी तयार करायला आवडते, काहीतरी निर्माण करण्याची उत्सुकता आहे, आणि देशाच्या विकासात हातभार लावायची इच्छा आहे, तर मेकॅनिकल इंजिनिअरिंग हीच तुमची योग्य निवड ठरू शकेन.
भारतातील प्रगतीचा भाग बना. भविष्यातील यंत्रणा घडवा. मेकॅनिकल इंजिनिअर बना!

**प्रा.गणेश कोंढाळकर**
अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनीयरिंग अँड रिसर्च
पार्वती, पुणे

दैनिक
# हॅलो प्रभात
■ सांगली ■ कोल्हापूर ■ बुधवार, १८ जून २०२५






# ‘गोकुळ कर्मचारी पतसंस्था’ ही कर्मचाऱ्यांचा विश्वासाचा आधार : चेअरमन नविद मुश्रीफ

## गोकुळचे चेअरमन नविद मुश्रीफ यांचा सत्कार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध संघ कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या राजारामपुरी येथील कार्यालयास गोकुळ दूध संघाचे नूतन चेअरमन नविद हसन मुश्रीफ यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी पतसंस्थेचे चेअरमन सचिन पाटील यांच्या हस्ते गोकुळचे चेअरमन नविद मुश्रीफ यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच गोकुळचे माजी चेअरमन व ज्येष्ठ संचालक विश्वास पाटील, माजी चेअरमन अरुण डोंगळे, संचालक किसन चौगले यांचा सत्कार पतसंस्थेच्या पदाधिकारीच्या हस्ते करण्यात आला.



यावेळी बोलताना नविद मुश्रीफ म्हणाले, गोकुळ कर्मचारी पतसंस्था ही केवळ आर्थिक व्यवहारांची संस्था नसून, गोकुळच्या सर्व कर्मचाऱ्यांच्या आर्थिक सुरक्षिततेचा व विश्वासाचा आधार आहे. गेल्या अनेक वर्षांत या संस्थेने सभासद कर्मचाऱ्यांना त्यांच्या विविध गरजांसाठी अत्यल्प व्याजदराने कर्जे उपलब्ध करून दिली आहेत. गोकुळच्या प्रगतीच्या वाटचालीत कर्मचाऱ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून त्यांचे आर्थिक हित जोपासणाऱ्या कर्मचारी पतसंस्थेची भुमिका भविष्यात आणखी बळकट व्हावी, यासाठी संघाच्या वतीने आवश्यक ती मदत व सहकार्य केले जाईल तसेच भविष्यातील कर्मचाऱ्यांची आर्थिक गरज ओळखून नव्या सुविधा सुरू करण्याची गरज असल्यास संघाचे व व्यवस्थापनाचे संस्थेस नेहमीच पाठबळ राहील, असे आश्वासनही यावेळी मुश्रीफ यांनी दिले.

याप्रसंगी गोकुळचे नूतन चेअरमन नविद मुश्रीफ, माजी चेअरमन व ज्येष्ठ संचालक विश्वास पाटील, माजी चेअरमन अरुण डोंगळे, संचालक किसन चौगले, गोकुळ कर्मचारी पतसंस्थेटचे चेअरमन सचिन पाटील, व्हा.चेअरमन पांडुरंग कापसे, संचालक राजेंद्र चौगले, जयदिप आमते, रामचंद्र पाटील, तुकाराम शिंगटे, सुनिल वाडकर, संदेश भोपळे, दत्तात्रय डवरी, अशोक पुणेकर, गिता उत्तुरकर, पतसंस्थेचे सचिव संभाजी माळकर तसेच पतसंस्थेचे कर्मचारी उपस्थित होते.

# तिर्थंकर एज्युकेशन ‘उत्कृष्ट शिक्षण संस्था’ म्हणून सन्मानित

**सांगली : हॅलो प्रभात**

येथील तिर्थंकर एज्युकेशन सोसायटी या ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या शैक्षणिक संस्थेला ग्रामीण भागातील उत्कृष्ट शिक्षण संस्था म्हणून गौरवण्यात




आलं आहे. हा सन्मान दि. १४ जून रोजी पार पडलेल्या दै.नवभारत समूहाच्या पुरस्कार समारंभात करणेत आला. या भव्य सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ना. आशिष शेलार, उत्तर प्रदेशचे उच्च शिक्षण मंत्री ना.आशिष सिंग पटेल, मेघाश्रय सामाजिक संस्थेच्या प्रमुख सीमा सिंग, आणि नवभारत वृत्तपत्राचे प्रमुख वैभव माहेश्वरी यांची प्रमुख उपस्थिती होती.

तिर्थंकर एज्युकेशन सोसायटीच्या वतीने, संस्थेचे चेअरमन रावसाहेब पाटील, संस्थापक प्रा. डी. डी. चौगुले, प्राचार्य डॉ.किरण वाडकर व सर्व संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.दिपक भिंगारदेवे आणि प्रा.गजानन पाटील यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

या सन्मानामुळे ग्रामीण भागातील गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी झटणाऱ्या संस्थांची प्रेरणा वाढली असून, तिर्थंकर एज्युकेशन सोसायटीने एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

# प्रथम संस्थेत प्रशिक्षणार्थींना प्रशस्तीपत्र वाटप

## ११ महिलाना मोफत किट वाटप

**करवीर : हॅलो प्रभात**

प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने ऑटोमोटिव्ह टू व्हीलर कोर्स आणि जनरल ड्युटी असिस्टंट या कोर्स पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र वितरण करण्यात आले.या कार्यक्रमांमध्ये विजय शिंगारे जिल्हा व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट कॉर्डिनेटर सुधाकर भदरगे हे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी ऑटोमोटिव्ह सेंटर मार्फत टू व्हीलर मेकॅनिक चा कोर्स करून नोकरी करणाऱ्या मुलींच्या साठी त्यांचे उत्पन्न अधिक वाढावे या अनुषंगाने त्यांना गॅरेज चालवण्यासाठीचे साधारण ४००० रक्कमेचे किट मोफत




देण्यात आले. ही संकल्पना दीदी का गॅरेज अंतर्गत राबविण्यात येत आहे. आतापर्यंत ११ महिलांना हे किट वाटप केले आहे.आत्तापर्यंत ४०० हून अधिक महिलांनी टू व्हीलर मेकॅनिकचे प्रशिक्षण घेतले आहे. या कार्यक्रमास सुधाकर भदर्गे, आसमा पठाण, मनीषा कांबळे, शितल कांबळे, नंदा रोकडे आणि हेल्थकेअर व ऑटोमोटिव्ह सेंटरचा सर्व स्टाफ उपस्थित होता.

# मानसिंगराव नाईक यांनी केली अनेक लोकहिताची कामे : विराज नाईक

**शिराळा : हॅलो प्रभात**

लोकप्रतिनिधी काळात मानसिंगराव नाईक यांनी अनेक लोकहिताची व गरजेची कामे पूर्ण केली, असे प्रतिपादन विराज उद्योग समूहाचे अध्यक्ष विराज नाईक यांनी केले. कुसळेवाडी पैकी दुरंदेवाडी, हुंबरवाडी (ता. शिराळा) येथे माजी आमदार मानसिंगराव नाईक भाऊ यांनी २५/१५ योजनेतून मंजूर केलेल्या ३० लाख रुपये खर्चाच्या काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन संपन्न त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

श्री. विराज नाईक म्हणाले, माजी आमदार नाईक यांनी लोकप्रतिनिधी असताना तालुक्याचा चौफेर विकास साधला. लोकहिताची व गरजेची अनेक कामे मार्गी लावली. गावातील रस्ते दीर्घकाळ टिकावेत म्हणून डांबरीकरण करण्या ऐवजी काँक्रीटीकरणास प्राधान्य दिले. मतदार संघाच्या प्रत्येक गावातील



अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरणाने मजबूत केले आहेत. आता सत्ता असली अथवा नसली तरी मानसिंगभाऊ व त्यांचे आम्ही सर्व कार्यकर्ते समाजकार्यात सक्रिय राहून जनसेवा करतच राहणार आहे.

प्रारंभी सोसायटीचे अध्यक्ष भास्कर पवार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. अध्यक्ष विराज नाईक यांच्या हस्ते श्रीफळ फोडून काँक्रीटीकरण कामाचे भूमिपूजन पार पडले. यावेळी माजी सरपंच विनोद पन्हाळकर, उपसरपंच मच्छिंद्रनाथ पवार, भालचंद्र पवार, शिवाजी पवार, अभी पवार, आनंदा मुंडे, वसंत खोत, सुरेश खोत, बाजीराव खोत, नानासो खोत, रघुनाथ खोत, नथुराम खोत, उमाजी मुंडे मनोज दळवी, शंकर खोत, मानसिंग दळवी, भानुदास बाबर, आनंदा खोत, कृष्णा खोत, दिनकर खोत, संतोष खोत, तानाजी खोत, प्रथमेश खोत, संकेत खोत, प्रज्वल खोत, आनंदा खोत यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाळांमध्ये नवागतांचे सुंदर स्वागत

## शाळेचा पहिला दिवस विविध कार्यक्रमांनी हाऊसफुल्ल

**गगनबावडा : हॅलो प्रभात**

गगनबावडा तालुक्यात शैक्षणिक वर्षाचा शाळांचा पहिला दिवस नवागतांच्या स्वागताने आणि विविध शैक्षणिक उपक्रमाने पार पडला. यावेळी लहान मुलांच्या चेहर्यावर आनंद ओसंडून वाहत होता.



गगनबावडा तालुक्यातील प्राथमिक शाळा निवडे, असळज, साळवण, वेसर्डे, असंडोली, मणदूर अशा अनेक गावच्या शाळेत नवगतांचे स्वागत झाले. प्रत्येक गावाच्या शाळेच्या प्रवेशद्वारावर पहिलीच्या नवीन विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांचे स्वागत पुष्प, खाऊ आणि फुगे देऊन करण्यात आले. वाजत गाजत विद्यार्थी पालक, नागरीक, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य व शिक्षक यांनी सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

शाळा पूर्व तयारी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळा पोषक वातावरण तयार करण्यात आले होते. मुलांच्या विविध प्रकारच्या चाचण्या घेण्यात आल्या. बॉल फेकणे, चित्र रेखाटने, रंग आणि चित्र ओळखणे, अंक लिहिणे, मोजणे, वस्तू ओळखणे, मुलांची उंची आणि वजन मोजण्यात आले.

यावेळी मुलांना पोषण आहाराचे वाटप करण्यात आले. आहारात गोड जिलेबी पदार्थ देण्यात आला. शेवटी पाठ्य पुस्तक आणि गणवेश वाटप करण्यात आले.

पूर्वी मुलांना शाळेत दाखल करताना मुलांची रडारड असायची, पण या अनोख्या पद्धतीने शाळा प्रवेश झाल्याने मुलांच्या चेहर्यावर आनंद ओसंडून वाहत होता.

# कर्तबगार महिलांचा आहिल्यादेवी होळकर पुरस्काराने गौरव

**रुकडी : हॅलो प्रभात**

साजणी (तालुका हातकणंगले) ग्रामपंचायतीच्या वतीने महिला आणि बालकल्याण विभागांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तबगार महिलांचा आहिल्यादेवी होळकर पुरस्कार देऊन साजणी ग्रामपंचायतच्या सभागृहामध्ये सन्मानित करण्यात आले. यामध्ये अंगणवाडी सेविका स्वाती यल्लाप्पा आणि आरोग्य विभागात काम करणाऱ्या मंगल लाटकर यांना या पुरस्काराने सन्मान चिन्ह सन्मानपत्र शाल श्रीफळ व रोख रक्कम देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी शिवाजी पाटील, अजिंक्य कोळी, सुरज कांबळे, प्रकाश यादव, कुमार कन्या उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत मनीषा मोघे यांनी केले. पुरस्काराचे स्वरूप व माहिती ग्रामपंचायत अधिकारी कविता बाबर यांनी विषद केली. शेवटी आभार स्वाती दानोळे यांनी मानले.

# जि.प.शाळा माडग्याळ येथे विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप

**माडग्याळ : हॅलो प्रभात**

माडग्याळ (ता.जत) जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, माडग्याळ येथे विद्यार्थ्यांसाठी पुस्तक वाटप कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून मार्केट कमिटीचे माजी संचालक विठ्ठल निकम, साखर कारखान्याचे माजी संचालक सदाशिव माळी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दशरथ सावंत, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग सावंत, युवा नेता सुरेश हाके, चंद्रू पहलवान, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सौ. सुनंदा नाटेकर, एसएमसी सदस्या सौ.रंजना कांबळे एस एमसी सदस्य, संभाजी सावंत, सौ. आरती बुध्याळ, नागेश ऐवळे, अंगद घाटगे,हणमंत नाटेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची स्वागत प्रस्तावना संतोष काटे यांनी केली. मुख्याध्यापिका सौ. सुवर्णा माळी यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन करून विद्यार्थ्यांना पुस्तके व शैक्षणिक साहित्य वाटप केले. यानंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप देखील करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी आभारप्रदर्शन मलकारी निकम यांनी केले.



# थोडक्यात महत्त्वाचे

## कॉईनडीसीएक्सद्वारे ऑटोमेटेड क्रिप्टो ट्रेडिंगची सुरुवात

**मुंबई : हॅलो प्रभात**

कॉईनडीसीएक्स या भारताच्या सर्वात मोठ्या क्रिप्टो एक्स्चेंजने ट्रेडट्रॉनसोबत सुरळीत एकत्रीकरण करून क्रिप्टो ट्रेडर्ससाठी ऑटोमेटेड ट्रेडिंगची सुरुवात केली आहे. ह्या नव्या फीचरमुळे मॅन्युअल हस्तक्षेपाशिवाय, आधीच निर्धारित केलेल्या रणनीतींच्या आधारे ट्रेडर्स खरेदी/विक्री ऑर्डर्स स्वयंचलित पद्धतीने कार्यान्वित करू शकतील. क्रिप्टो मार्केट २४/७ चालू असते, त्यामुळे ऑटोमेशन खूप फायदेशीर ठरेल.

## डाबर आवळाची फादर्स-डे निमित्त विशेष मोहीम




**मुंबई : हॅलो प्रभात**

केसांची निगा राखणारा भारतातील सर्वात विश्वासार्ह आणि प्रतिष्ठित ब्रँड डाबर आवळा हेअर ऑइलने फादर्स डे निमित्त मजेलस डॅडफ ही एक नवीन डिजिटल मोहीम सादर केली आहे जी भारतीय वडिलांच्या अव्यक्त भावनिक गरजांवर प्रकाश टाकते. इन्स्टामार्टच्या सहकार्याने तयार केलेली ही हृदयस्पर्शी मोहीम फादर्स डेनिमित्त भेटवस्तू देण्याची पद्धत पुन्हा परिभाषित करते. ही डिजिटल फिल्म एका वडिलांची कथा आहे जे रील, सेल्फी आणि शेअर केलेल्या क्षणांद्वारे आपल्या मुलीला तिच्या आईवर प्रेम करताना पहातात तेव्हा ते अधिकाधिक मत्सर करतात. त्यांना एकटे पडल्यासारखे वाटत असताना ते उपहासाने विचारतात की आज पुन्हा मदर्स डे आहे का? हे शब्द ऐकताच मुलीला तिची चूक लक्षात येते आणि ती लगेचच इन्स्टामार्टद्वारे डाबर आवळा हेअर ऑइल ऑर्डर करते. अवघ्या काही मिनिटांत ती वडिलांना घरीच केलेल्या डाबर आवळा हेअर ऑइलच्या चंपीद्वारे एक खास अनुभव प्रदान करते. याद्वारे वडिलांना आराम तर जाणवतोच पण त्यांच्या चेहऱ्यावर हास्य देखील फुलते.

## मंगेश चिवटे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



**नातेपुते : हॅलो प्रभात**

मंगेश चिवटे यांच्या वाढदिवसानिमित्त नातेपुते येथील पर्वतेश्वर नगर मध्ये वृक्षारोपण करण्यात आले. नातेपुते ग्रामीण रुग्णालय मधील रुग्णांना फळ वाटप, तसेच दोन पैलवान दत्तक घेत सामाजिक बांधिलकी जोपासण्यात आले. यावेळी तालुकाप्रमुख सतीश सपकाळ, जिल्हा उपप्रमुख दादासाहेब लोखंडे, कार्यप्रमुख महादेव तुपसौंदर यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन नातेपुते शहर प्रमुख पै.निखिल पलंगे, भैया लांडगे, मंगेश अवघडे, गणेश खंडागळे आदींसह इतर शिवसैनिकांनी केली.

## करंजफेण शाळेमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे वाजत-गाजत स्वागत



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

दीड महिन्याच्या उन्हाळी सुट्टीनंतर शाळा सुरू झाल्या नव्या शैक्षणिक वर्षात उत्साही वातावरणात विदयार्थ्यांनी शाळेत हजेरी लावली. पन्हाळा तालुक्यातील करंजफेण येथील जि.प.प्राथमिक शाळेच्या विदयार्थ्यांचे वाजत गाजत स्वागत केल्याने विदयार्थी भारावले. दरम्यान शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धर्मेंद्र कांबळे, कोमल कांबळे, मुख्याध्यापक अजित पाटील यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य,खाऊ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केल्याने विदयार्थ्यांचे चेहरे खुलले. यावेळी सुनील लाड,संभाजी पाटील,राहुल शेटे,सुनिता शिंदे,गंगाधर दहिफळे आदी उपस्थित होते.

## ‘सजना’ सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

प्रेमाच्या गंधाने सुरू झालेली एक सुंदर गोष्ट, जेव्हा नात्यांमध्ये गुंतते तेव्हा त्या निरागस प्रेमातूनच जन्म होतो एक आगीत भडकणारा सुड! मराठी चित्रपटसृष्टीत एक वेगळीच लाट घेऊन येत आहे सजना चित्रपटाचा हा ट्रेलर. जो नुकताच प्रदर्शित करण्यात आला आहे. विशेष म्हणजे ट्रेलर हा केवळ एक साधा रिलीज नसून, तो एक खास प्रसंग ठरला आहे. या ट्रेलरचे थेट प्रक्षेपण मराठीतील विविध मनोरंजनशी संबंधित चॅनेलच्या डिजिटल प्लॅटफॉर्मवर लाईव्ह स्ट्रीम करण्यात आला.

# संमिश्र

## जय बजरंग दूध संस्था नावारूपाला आणणार : रविंद्र जाधव



**करवीर : हॅलो प्रभात**

सभासदांना लाभ होण्यासाठी व दुध संस्था नावारूपाला आणणार असल्याचे नुतन तज्ञ संचालक रवींद्र जाधव यांनी सांगितले. करवीर तालुक्यातील हणमंतवाडी येथील जय बजरंग दूध संस्थेच्या स्विकृत संचालक पदी रविंद्र जाधव यांची निवड झाली त्यावेळी ते बोलत होते. सभासद मोठा झाला तर संस्था आपोआप मोठी होईल.

यापुढे संस्थेचा कारभार चांगला करून काटकसरीने करण्याचा इशारा उद्योजक संजय जाधव यांनी निवडी प्रसंगी दिला.यावेळी गटनेते संग्राम भापकर, माजी सरपंच तानाजी नरके, दिलीप खिल्लारी,राम कचरे आदी उपस्थित होते.

## नातेपुते– पिरळे– बांगार्डे एसटी होणार सुरू



### प्रमोद शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

**नातेपुते : हॅलो प्रभात**

सामाजिक कार्यकर्ते प्रमोद शिंदे यांच्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून अनेक वर्षापासून बंद असलेली नातेपुते– पिरळे– बांगार्डे मुक्कामी एसटी उद्यापासून सुरू होणार असल्याचं लेखी पत्र आगार प्रमुख यांनी दिले आहे.

पिरळे– बांगार्डे गाव हे माळशिरस तालुक्यातील पश्चिम भागातील शेवटचे गाव म्हणून ओळखले जाते. या गावांना पूर्वी दळणवळणासाठी एकच नातेपुते– पिरळे – बांगार्डे एसटी होती. गेल्या दहा १२ वर्ष पासून ही एसटी बंद करण्यात आली होती. या बंद झालेल्या एसटीमुळे अनेक विद्यार्थी व नागरिकांना त्रास सहन करावा लागत होता. अनेक विद्यार्थी व नागरिक प्रवासासाठी पिरळे गावातून दोन अडीच किलोमीटर पायी जात होते. याचीच दखल घेत प्रमोद शिंदे यांनी एसटी सुरू होण्यासाठी गेल्या वर्षी पासून पाठपुरावा सुरू केला होता.या संदर्भात निवेदन देऊन धरणे आंदोलन केले होते. तसेच ३० जून रोजी पालखी महामार्ग,नातेपुते– वालचंदनगर रोड वर विद्यार्थ्यां समवेत तीव्र आंदोलन करणार असल्याचे निवेदन आगार प्रमुख यांना दिले. याचीच दखल घेत आभार प्रमुख यांनी तात्काळ या मागणीची दखल घेतली व एसटी सुरू होण्यासंदर्भात लेखी पत्र देऊन एसटी सुरू केली

## राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिबिर संपन्न



**देवराष्ट्रे : संदेश जाधव**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुका उपाध्यक्ष सतीश येताळ यांच्या पुढाकाराने देवराष्ट्रे येथे दि.१५ जून रोजी आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले.गावात आधार कार्ड केंद्र नसल्यामुळे नागरिकांना लांब जाऊन आपली कामे करावी लागत होती. ही अडचण लक्षात घेऊन मनसेच्या वतीने एक अभिनव उपक्रम राबवण्यात आला, ज्यामुळे अनेक ग्रामस्थांना आधार कार्डशी संबंधित सेवा गावातच मिळाल्या. या शिबिरावेळी तालुकाध्यक्ष विशाल शिंदे, विभाग अध्यक्ष अजय शिंदे, अनिल माने व महाराष्ट्र सैनिक तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कै.ना.भास्करराव जाधव यांची जयंती साजरी

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

राजर्षि शाहू गव्हर्मेंट सर्व्हंटस् को – ऑपरेटिव्ह बँकेमध्ये ना. भास्करराव जाधव यांची १५८ वी जयंती उत्साहात पार पडली. ना. भास्करराव जाधव यांच्या पुतळ्याला बँकेचे अध्यक्ष मधुकर पाटील (एम्. एस्) व संचालकांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. ना. भास्करराव जाधव यांचा आदर्श व दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचे मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करीत कामकाज करीत असून बँक १०९ व्या वर्षात पदार्पण करणार आहे. ना. भास्करराव जाधव यांच्या आर्थिक साक्षरतेच्या विचारांचा ठेवा जतन करुन, बदलत्या आधुनिक बँकिंग कामकाजाचा अवलंब करीत बँकेचे प्रगतीसाठी यापुढेही काम करीत राहणार असल्याचे यावेळी नमूद केले.

# विकसित कृषी संकल्प अभियानातर्गत शेतकऱ्यांशी संवाद

### ९० गावातील १८ हजार शेतकऱ्यांशी झाला संवाद



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराबाबत मार्गदर्शन करून कृषी उत्पादन क्षमता वाढविण्याच्या हेतूने केंद्र शासनाच्यावतीने राबविण्यात आलेल्या ‘विकसित कृषी संकल्प अभियान’ला उत्फूर्त प्रतिसाद लाभला. या अभियानातर्गत डी. वाय पाटील एज्युकेशन सोसायटीच्या तळसंदे येथील कृषी विज्ञान केद्रामार्फत कोल्हापूर जिल्ह्यात ९० गावामधील १८ हजार शेतकऱ्यांशी शास्त्रज्ञानी संवाद साधला. कृषी विभाग आणि आत्मा कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला.विकसित कृषि संकल्प अभियान अंतर्गत सहा तालुक्यातील ९० गावांमध्ये शेतकऱ्यांना पिक उत्पादन तंत्रज्ञान, पशुपालन, प्रक्रिया, महिला आरोग्य आणि पोषण तसेच शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. ऊस, भात, सोयाबीन आणि भुईमूग या पिकांचे उत्पादन तंत्रज्ञान, आधुनिक मशागत, सुधारित बियाण्यांची निवड, खत व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रण, सिंचन तंत्र, कापणीचे योग्य तंत्र अशा सर्व बाबींवर सविस्तर माहिती देण्यात आली.या अभियानादरम्यान झालेल्या प्रशिक्षणामुळे शेतकऱ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याची सकारात्मक मानसिकता तयार झाली असून, या उपक्रमामुळे उत्पादनवाढीसह उत्पन्नवाढीस हातभार लागेल असा विश्वास, डी वाय पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख, वरिष्ठ शास्त्रज्ञ जयवंत जगताप यांनी व्यक्त केला. या अभियान काळात भारतीय कृषी अनुसंधान परिषद, पुष्प विज्ञान अनुसंधान निदेशालयचे डॉ. अरविंद कुमार वर्मा, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ गणेश कदम, वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. संजय कड, शास्त्रज्ञ (कृषि विस्तार) डॉ बशीत राजा, वैज्ञानिक डॉ. सत्यवान आगिवले, क्रांतिसिंह नाना पाटील पशू वैद्यकीय महाविद्यालय शिरवळ सहा. प्रा. डॉ. सुनील कराड, विभागीय कृषी संशोधन केंद्र सहा. प्रा.डॉ. संभाजी जाधव, कोरोमंडलचे इंटरनॅशनलचे अमोल मलकमीर, धनंजय पाटील यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.

या कार्यक्रमसाठी डी.वाय. पाटील एजुकेशन सोसायटी कृषी विज्ञान केंद्रचे वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रा. जयवंत जगताप, प्रा. सुधीर सूर्यगंध, प्रा. दीपक पाटील, प्रा. राजवर्धन सावंत भोसले, प्रा. दिपाली मस्के, डॉ निनाद वाघ यांचे मार्गदर्शन तर प्रा. गंगासागर मोर, प्रकाश पाटील, रोहन साळोखे, बाजीराव पाटील, राजू माने, आणि रवींद्र शिंदे यांचे सहकार्य लाभले.

## बांधकाम कामगारांना संसारोपयोगी साहित्य वाटप

**कागल : गोरख कांबळे**

कागल,गडहिंग्लज व उत्तूर विधानसभा मतदारसंघात सव्वा लाखाहून अधिक बांधकाम कामगारांना लाभ देण्याचे भाग्य मला परमेश्वराने दिले, असे प्रतिपादन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.येथील बापूसाहेब महाराज चौकात कागल तालुक्यातील बांधकाम कामगारांना ४ हजार २८९ भांडी संच वाटप कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी मंत्री मुश्रीफ बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जिल्हा बँकेचे संपालक भैय्या माने, कागलचे माजी नगराध्यक्ष प्रकाश गाडेकर, मुरगुडचे



माजी नगराध्यक्ष प्रविणसिंह पाटील, नवल बोते, चंद्रकांत गवळी, अस्लम मुजावर, प्रविण काळबर, सहाय्यक कामगार आयुक्त विशाल घोडके आदिंची प्रमुख उपस्थिती होती. मंत्री मुश्रीफ म्हणाले, कागल विधानसभा मतदारसंघात सव्वा लाख बांधकाम कामगारांची नोंदणी झाली आहे. यापैकी ७५ हजार बांधकाम कामगारांना भांडी संच वाटप झाले आहे. बांधकाम कामगारांना जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या योजना शासनाने दिल्या आहेत. शिक्षणासाठी अनेक योजना आहेत. नूतनीकरण वर्षाला झाले पाहिजे. दोन लाखापर्यंतचे उपचार मोफत केले जाणार आहेत. येणाऱ्या निवडणूकीत घड्याळ, कमळ, धनुष्यबाण चिन्हावर कटाकट बटण दाबा आणि महायुतीला चांगले यश मिळवून द्या, असे आवाहन वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी केले.कार्यक्रमास अशोक वड्ड,नवाज मुश्रीफ, इरफान मुजावर, पंकज खलिप, किरण मुळीक, शानूर पखाली, माधवी मोरबाळे, यांचेसह लाभार्थी, नागरिक,महिला, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्राथमिक शाळेतील मुलांची पर्यायी बैठक व्यवस्था करा



### वंचित बहुजन आघाडीची निवेदनाद्वारे मागणी

**करवीर : हॅलो प्रभात**

गडमुडशिंगी (ता.करवीर) येथील केंद्रीय प्राथमिक शाळा, कन्या विद्या मंदिर, कुमार विद्या मंदिर शाळेचे बांधकाम सुरू आहे. आता पावसाळ्याचे दिवस असून १५, जून पासून शाळा सुरू होत आहेत. सदरच्या शाळेमध्ये पटसंख्या मोठी असून मुला मुलींना बैठकीची व्यवस्था चांगली असावी, जेणेकरून सांस्कृतिक हॉल व मंडळाचे हॉल ज्या ज्या ठिकाणी बैठक व्यवस्था करता येईल ती करण्यात यावी. जे हॉल जीर्ण व नादुरुस्त असतील ते वापरण्यात घेऊ नये. मुला मुलींची पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व शौचालय व्यवस्था करण्यात यावी. यासाठी ग्रामपंचायतीने तात्काळ बैठक बोलवून गावातील शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक, ग्रामपंचायत सदस्य, नागरिकांना नियोजन करून बैठक व्यवस्था करावी. अशा मागणीसाठी निवेदन देण्यात आले. यावेळी अर्जुन कांबळे करवीर सचिव,अर्जुन गोंधळी, करवीर महासचिव शिवाजी कांबळे, शाखा उपाध्यक्ष संदीप गोंधळी, माथाडी अध्यक्ष संतोष कांबळे, प्रसिद्धी प्रमुख सारंग कांबळे उपस्थित होते.

## भारतमाता विधालयात चिमुकल्यांचे जोरदार स्वागत

### रंगबेरंगी फुग्यांची सजावट करत नवीन विद्यार्थ्यांचे औक्षण

**सांगली : हॅलो प्रभात**

चिकुर्डे सह पंचक्रोशीत आपल्या बौद्धिक आणि क्रीडा क्षेत्रात नावलौकिक मिळवलेली, माझी शाळा मुख्यमंत्री शाळा या अभियानात यश संपादन केलेली, नवभारत शिक्षण मंडळ सांगली या संस्थेची भारत माता माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात पहिल्याच दिवशी रंगबेरंगी फुग्यांची सजावट करत रांगोळी काढून, नवीन विद्यार्थ्यांचे औक्षण करत त्यांच्यावर झेंडूच्या फुलांची पुष्पवृष्टी करून पहिल्याच दिवशी



चिमुकल्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले.

उन्हाळा सुट्टीनंतर शाळेचा पहिला दिवस म्हणजे नवीन शाळा,नवीन मित्र,नवीन शिक्षक याची उत्सुकता विद्यार्थ्यांना असते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष तथा चिकुर्डे गावाचे सरपंच रणजीतदादा पाटील, श्रीनिवास डोईजड काका यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती, विद्यार्थी सुरक्षा व भौतिक विकसन समितीचे सर्व पदाधिकारी यांच्या शुभहस्ते शालेय परिसरात वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वितरण करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक दादासो सरगर, पर्यवेक्षक विश्वास पाटील आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामचंद्र बागडी यांनी तर आभार जयेंद्र कांबळे यांनी केले.पालक, शिक्षक, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

## हेल्थ इक्विटी फेलोशिप जाहीर

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

अझीम प्रेमजी फाउंडेशनने ‘अझीम प्रेमजी हेल्थ इक्विटी फेलोशिप’ जाहीर केली आहे. ही फेलोशिप १८ महिन्यांची असून, पदव्युत्तर डॉक्टरांसाठी एक सखोल आणि प्रत्यक्ष अनुभव देणारी शिकण्याची मोठी संधी आहे. ही फेलोशिप अझीम प्रेमजी फाउंडेशन आणि देशभरातील ११ प्रतिष्ठित आरोग्य संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून राबवली जात आहे. या कार्यक्रमाअंतर्गत फेलोशिपधारकांना ग्रामीण भागातील रुग्णांसोबत प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव मिळणार आहे. विविध रुग्णप्रकारांच्या हाताळणीचा सराव आणि वरिष्ठ डॉक्टरांकडून मार्गदर्शन यामुळे फेलोजना प्रभावी क्लिनिकल कौशल्ये आणि समुदायातील आरोग्यविषयक अनुभव मिळणार आहे. ही फेलोशिप स्वीकारल्यास फेलोजना आरोग्यसेवेच्या आघाडीच्या पातळीवर प्रत्यक्ष कामाचा मौल्यवान अनुभव मिळणार आहे. आरोग्य क्षेत्रातील विषमतेची कारणे आणि अडथळे समजून घेण्याची संधी या फेलोशिपमुळे मिळेल. अनुभवी तज्ज्ञ आणि स्थानिक समुदायासोबत मिळून परिणाम कारक उपाययोजना राबवण्याची संधीही मिळू शकते. शिवाय आरोग्य क्षेत्रात दीर्घकालीन बदल घडवण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या तत्पर व्यक्तींच्या नेटवर्कचा भाग होण्याची संधीही साधता येणार आहे.

## चिंचणी येथे ‘कृष्णा’च्या कृषी कन्यांचे स्वागत

### शेतकऱ्यांना देणार आधुनिक तंत्रज्ञानाचे धडे

**देवराष्ट्रे : संदेश जाधव**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत असलेल्या जयवंतराव भोसले कृष्णा कृषी महाविद्यालय रेठरे बुद्रुक येथील अंतिम वर्षाच्या विद्यार्थिनी ग्रामीण कृषी जागृती आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत चिंचणी तालुका कडेगाव येथे दाखल झाल्या आहेत. पुढील



पाच महिने या विद्यार्थिनी शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची विविध प्रात्यक्षिके दाखवून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. कृषिकन्यांनी चिंचणी ग्रामपंचायतीस भेट दिली त्यावेळी सरपंच ड.रमेश मदने उपसरपंच दत्तात्रय माने, ग्रामसेवक सचिन कांबळे, अभिजीत माने यांच्यासह शेतकऱ्यांनी त्यांचे स्वागत केले. सदर विद्यार्थिनी पुढील पाच महिने चिंचणी येथे वास्तव्य करून ग्रामीण भागातील शेतीविषय विविध गोष्टींचा अभ्यास करणार आहेत सध्या स्मार्टफोन आणि इंटरनेटच्या वाढत्या वापरामुळे शेती कृषी आधारित उद्योग आणि हवामानाची संबंधित माहिती विविध पद्धारे कशा मिळवता येतील याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य अशोक फरांदे, प्रा. दीपक भिलवडे,कार्यक्रम प्रा अमोल आडके,विषय शिक्षक तज्ञ यांच्या मार्गदर्शनाखाली अदिती मोरे, सहभागी झाल्या आहेत.

# प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न मार्गी लागतील : आ.जयंतराव पाटील

### प्रकल्पग्रस्तांच्या समवेत आढावा बैठक



**सांगली : हॅलो प्रभात**

चांदोली अभयारण्य व वारणा प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. जयंतराव पाटील यांनी आज सांगली जिल्हाधिकारी कार्यालयात प्रकल्पग्रस्तांना सोबत घेऊन आढावा बैठक घेतली. प्रकल्पग्रस्तांचे प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लागतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. प्रकल्पग्रस्तांना मिळणाऱ्या मदतीच्या बाबतीतील कागदपत्रे सध्या वन विभागाच्या वतीने वित्त विभागाकडे पाठविल्याची माहिती आ.जयंतराव पाटील यांनी बैठकीत दिली. पाठबंधारे विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या निर्वाह भत्त्याबाबत ३४५ प्रकल्पग्रस्तांपैकी १०४ खातेदारांना वाटप पुर्ण झाले असुन उर्वरित पात्र खातेदारांच्या करीता निधी मागणी करण्यात आला आहे. अशी माहिती वारणा पाठबंधारे विभागाचे अभियंता नितेश पोतदार यांनी दिली. या बैठकीत प्रकल्पग्रस्तांना जमिन देणे, निर्वाह भत्ता निधी, जमिन प्लॉट वाटप, प्रकल्पग्रस्तांना १ ते ६ शर्ती कमी करुन वर्ग २ मधुन १ करणे, चुकलेल्या ताली व घरे यांचे मूल्यांकन करणे, चुकलेले खातेदार व भुमिहीन प्रकल्पग्रस्तांना कागदपत्रे पडताळणी करुन त्यांना यादीत समाविष्ट करणे, खातेदारांना घरबांधणी अनुदान देणे, नागरी सुविधा पुरविणे, आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच इस्लामपूर शहरातील निनाईनगर वसाहतीतील प्लॉट मोजणी मोजणी फी शासनाने भरावी अशी मागणी देखील आ. जयंतराव पाटील यांनी केली. या बैठकीस अप्पर जिल्हाधिकारी सुशांत खांडेकर, जिल्हा पुनर्वसन अधिकारी रघुनाथ पोटे, वाळवा उपविभागीय अधिकारी श्रीनिवास अर्जुन, वाळवा तहसीलदार सचिन पाटील, शिराळा तहसीलदार श्यामला खोत, सांगली अप्पर तहसीलदार आश्विनी वरुटे, सविता लष्करे, एस. डी. पाटील, वनविभाग, जलसंपदा विभागाचे अधिकारी, संजय बजाज, खंडेराव जाधव व प्रकल्पग्रस्त नागरिक आदी उपस्थित होते.

हॅलो प्रभात
MY DISTRICT. बुधवार, १८ जून २०२५

## कोतोली येथे माध्यमिक विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

**कोतोली : हॅलो प्रभात**

दिड महिन्याच्या उन्हाळी सुट्टीनंतर शाळा सुरू झाल्या नव्या शैक्षणिक वर्षात उत्साही वातावरणात विदयार्थ्यांनी शाळेत हजेरी लावली. नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत औषण सौ.एस.एस.पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.तर प्राचार्य डॉ विजयकुमार पाटील, सचिव शिवाजीराव पाटील यांच्या हस्ते विदयार्थ्यांना शैक्षणिक साहित्य,खाऊ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केल्याने विदयार्थ्यांचे चेहरे खुलले.यावेळी मुख्याध्यापिका टी.के.पाटील, शिवाजी खापणे, मानसिंग पाटील आदी उपस्थित होते.

# संमिश्र

## मा.आ.बबनदादा शिंदे लवकर बरे व्हावेत



### यमाई देवीच्या मंदिरात आरतीतून सदिच्छा

**मोडनिंब : संतोष पांढरे**

माढा तालुक्याचे मा.आ.बबनराव शिंदे हे उपचारासाठी अमेरिकेला रवाना झालेले आहेत. त्यासाठी ते लवकर बरे होऊन पूर्वीप्रमाणेच नव्या जोमाने व आत्मविश्वासाने पुन्हा जनतेच्या सेवेत सक्रीय व्हावेत,या सदिच्छेने श्री यमाई देवीच्या मंदिरात आरती शुक्रवारी सायंकाळी सात वाजता श्री यमाई देवी ट्रस्टच्या वतीने करण्यात आली. या आरतीतून सदिच्छा आणि सकारात्मक ऊर्जा देवतेच्याचरणी अर्पण करून, बबन दादांना लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना करण्यात आली. यावेळी डॉ. संतोष दळवी, माजी सरपंच कैलासतोडकरी यांनी बबन दादांच्या प्रकृतीसाठी सदिच्छा व्यक्त केली. याप्रसंगी अध्यक्ष शहाजीभाऊ पाटील, सचिव राजेश पाटणे, खजिनदार राजू राऊत, डॉ.संतोष दळवी,महेश पाटणे, माजी सरपंच कैलास तोडकरी, निमगावचे विशाल वाघमारे, दत्तात्रय सुर्वे यांच्यासह बहुसंख्येने मोडनिंबवासी उपस्थित होते.

## ऋतुपर्ण पाटील यांचे नीट परिक्षेत यश

**पन्हाळा : हॅलो प्रभात**



पन्हाळा तालुक्यातील बोरपाडळे येथील संजीवनी मल्टीपर्पज फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. दिपक पाटील व डॉ. स्वाती पाटील यांचे चिरंजीव ऋतुपर्ण पाटील यांनी नीट परीक्षेत ५३५ गुण मिळवून यश संपादन केल आहे. डॉ कुटूंबाकडे पेशंटच्या सेवेत वेळ द्यावा लागतो.

यामुळे घरी वेळ द्यायला मिळत नाही. तरीही ऋतुपर्ण यांनी स्वतः अभ्यास करून परिक्षेत घवघवीत यश मिळविले. याबद्दल त्यांचे कौतुक केले जातं आहे.

## 'आज आसमान बौना' पुस्तकाचे प्रकाशन



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

येथील विवेकानंद कॉलेजचे हिंदी विभागाचे प्राध्यापक डॉ. दीपक तुपे यांच्या 'आज आसमान बौना' या हिंदी पुस्तकाचे प्रकाशन पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते झाले. डॉ. तुपे यांनी विवेकानंद कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर लिखित 'आज गगन ठेंगणे' या मराठी पुस्तकाचा अनुवाद केला आहे. या पुस्तकाचे प्रकाशन सिरमचे अतिरिक्त संचालक रोहित शिंदे, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव सौ. शुभांगी गावडे, संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, सहसचिव (प्रशासन) डॉ. टी. एस. गवळी, संस्थेचे सीईओ श्री कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य आर. आर. कुंभार, प्रा. (डॉ.) एकनाथ आळवेकर यांच्या उपस्थित झाला. डॉ. तुपे यांचे यापूर्वी 'हिंदी भाषा और सूचना प्रौद्योगिकी और हिंदी पत्रकारिता के विविध आयाम' ही दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

त्यांचे राष्ट्रीय-अंतरराष्ट्रीय पत्रिकांमध्ये ६२ शोध निबंध प्रकाशित झाले आहेत. तसेच १०० पेक्षा अधिक राष्ट्रीय-अंतरराष्ट्रीय कार्यशाळा आणि चर्चासत्रामध्ये आलेख वाचन केले आहे. त्यांना १७ वर्षाचा अध्यापनाचा व १४ वर्षे संशोधन अनुभव आहे. त्यांनी विभिन्न दैनिकात पत्रकार, अनुवाद, सहसंपादक म्हणून काम केले आहे.

## भार्गव पुजारीचे नीट मध्ये उज्वल यश

**नृसिंहवाडी : हॅलो प्रभात**

येथील भार्गव भालचंद्र बड्ड-पुजारी यांनी नुकत्याच झालेल्या ऑल इंडिया नीट मध्ये ७०० पैकी ५६४ गुण मिळवून देशांमध्ये २० लाख ८० हजार विद्यार्थ्यांमध्ये ७१८५ बी रँक प्राप्त केली त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत असून कोल्हापूर येथील सर्वग्यान अक्ॅडमी ॲकाडमीचे कार्यकारी संचालक विवेक सिंग व सर्व त्यांच्या तज्ञ शिक्षक यांचे मार्गदर्शन त्याला लाभले. त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्याला आई-वडिलांचे प्रोत्साहन अक्ॅडमी चे संचालक विवेक यांचे मार्गदर्शन मिळाले. वैद्यकीय क्षेत्रातच करिअर करायचे या उद्देशाने आपण या नीट परीक्षेसाठी विशेष परिश्रम घेतले यात मला अक्ॅडमीचे विवेक सिंग तसेच अन्य शिक्षक याचबरोबर घरातील सर्व मंडळींचे प्रोत्साहन यामुळे यश मिळाल्याचे भार्गव पुजारी यांनी सांगितले.

# दर्जेदार शिक्षणाने विद्यार्थी घडतात : अमोल डांगे

**कडेगांव : हॅलो प्रभात**

दर्जेदार शिक्षणासाठी कुशल आणि प्रशिक्षित शिक्षकांची आवश्यकता असते. जे ज्ञान देण्यात आणि प्रभावी सूचना देण्यात महत्त्वाची भूमिका बजावत असतात. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळाल्यास त्यांच्या मूलभूत, शैक्षणिक क्षेत्रांच्या पलीकडे जाऊन संवाद आणि समस्या सोडवण्याची कौशल्ये त्यांच्यात विकसित होत असतात ज्यामुळे आत्म विश्वास आणि निर्णय घेण्याच्या कौशल्यांना पोषण वातावरण तयार झाल्याने विद्यार्थी घडत असल्याचे प्रतिपादन कडेगाव चे उपनगराध्यक्ष अमोल डांगे

### जि.प. उर्दू शाळेत नूतन विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन



यांनी केले ते जि प उर्दू शाळा कडेगाव येथे नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या स्वागत कार्यक्रमाप्रसंगी बोलत होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इम्तियाज उर्फ बाळूभैय शेख, मुख्याध्यापक समीर शिकलगार, नगरसेवक मुख्तार पटेल प्रमुख उपस्थित होते. यावेळी जि.प. उर्दू शाळेत नव्याने ॲडमिशन घेतलेल्या विद्यार्थ्यांची शिक्षणाची सुरुवात अधिक उत्साही व्हावी यासाठी पुष्पगुच्छ व पुस्तके देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी झाकीर मुल्ला, तोसिफ इनामदार, पदवीधर शिक्षक राजाराम खोत,नोमान खान, शाहीन बेग, सलेहा परवीन यांच्यासह विद्यार्थी पालक उपस्थित होते.

# शाळा प्रवेशोत्सवात जिल्हाभरात जल्लोष

## कोल्हापूर जिल्ह्यात १९५८ शाळांमध्ये नवागतांचे उत्साहात स्वागत

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या प्रारंभी कोल्हापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शाळा प्रवेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. शासनाच्या आदेशानुसार शाळेच्या पहिल्या दिवशी नवागत विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ, औक्षण, मिठाई, आणि रंगीबेरंगी सजावटीसह जंगी स्वागत करण्यात आले.

गावात प्रभातफेरी, ढोल-ताशे, दवंडी, तसेच काही ठिकाणी बैलगाडी आणि ट्रॅक्टर ट्रॉली सजवून विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. यामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश आणि गोड पदार्थांनी युक्त शालेय पोषण आहार देऊन शिक्षण वर्षाची गोड सुरुवात झाली. शाळांना भेट देण्यासाठी लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, सीईओ, शिक्षक आणि विविध मान्यवर उपस्थित होते. काही शाळांमध्ये वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाचा संदेशही देण्यात आला.पालकमंत्री मा. प्रकाश आबिटकर यांनी आकुर्डे शाळेला भेट दिली, तर वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनी लिंगनूर दुमाला येथे विद्यार्थ्यांचे स्वागत केले. जिल्हाधिकारी यांनी आजरा तालुक्यातील किटवडे धनगरवाडा शाळा आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चंदगड तालुक्यातील कोलिक शाळा यांना भेट दिली.या उपक्रमांतर्गत दाखलपात्र बालकांचे सर्वेक्षण, पालकभेटी, शाळा व्यवस्थापन समितीची बैठक, ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांशी सुसंवाद आदी उपक्रम प्रभावीपणे राबवले गेले.

## नवागत विद्यार्थ्यांचे जयश्री जाधव यांच्या हस्ते स्वागत



**पन्हाळा : हॅलो प्रभात**

येथील नेहरू विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेज (ता. पन्हाळा) या शाळेत नवीन विद्यार्थी प्रवेशोत्सव कार्यक्रम उत्साहात साजरा. प्रमुख पाहुणे म्हणून सौ.जयश्री जाधव शिक्षण विस्तार अधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग कोल्हापूर उपस्थित होत्या.

त्यांनी शाळेत नवीन दाखल झालेल्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले त्याचबरोबर नवीन विद्यार्थ्यांचे शाळेमार्फत सवाद्य मिरवणूक व त्यांच्यावर पुष्पवृष्टी करत स्वागत करण्यात आले. त्याचबरोबर नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्याकडून शाळेच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. त्यावेळी सौ जयश्री जाधव शिक्षण विस्तार अधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग कोल्हापूर,शाळेचे मुख्याध्यापक श्री. पी.एस पोर्ले कर , वाय के पाटील शिवाजी कुंभार , एस.एस लव्हटे, आर जी कांबळे , सुवर्णा पाटील आदींसह शिक्षक विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# डॉ.घायतडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित

**कोपरगाव : हॅलो प्रभात**




गेल्या अनेक वर्षापासून डॉ.घायतडकर-पाटील डेंटल हॉस्पिटल व अशोकराव घायतडकर पाटील सेवाभावी संस्थेमार्फत आरोग्य शिबिर, रक्त तपासणी शिबिरे, मोफत दंत रोग तपासणी व अल्प दरात उपचार, मुख कॅन्सर निदान शिबिरे, वृक्षारोपण, धार्मिक सण उत्सव आदी क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्य करत असलेले तसेच कोरोना महामारीत आपला जीव धोक्यात घालून सेवा दिल्याने महाराष्ट्र शासनाच्या वतीने विशेष सन्मानित केलेले डॉ कुणाल अशोकराव घायतडकर यांना सरपंच सेवा संघाच्या वतीने ते करत असलेल्या कार्याचा गौरव म्हणून राज्यस्तरीय समाजभूषण पुरस्कार गौरवण्यात आले.

तर महिलांप्रती नेहमीच आदराची भावना असलेल्या महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी शासनाच्या समृद्धी शहर स्तर या संस्थेमार्फत वेगवेगळ्या माध्यमातून महिलांना व्यवसाय निर्मितीसाठी शासनाच्या नियमाप्रमाणे बँकेच्या वतीने कर्ज पुरवठा करत बचत गटातील महिलेला स्वावलंबी बनवण्यासाठी अहोरात्र धडपड करत असलेल्या कोपरगाव समृद्धी शहर स्तर संघाच्या व्यवस्थापक हर्षा बाळकृष्ण पाटील यांना महिलां नारीशक्ती सन्मान या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले.स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या दिमाखदार पुरस्कार वितरण सोहळ्यात राज्यभरातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या अनेक मान्यवरांचा राज्याचे भूषण दोनवेळा भारत सरकार कडून राष्ट्रपती डॉ ए.पी. जे.अब्दुल कलाम व दुसऱ्या वेळेला राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या शुभहस्ते तसेच महाराष्ट्र सरकार तर्फे विशेष पुरस्काराने गौरविण्यात आलेले छत्रपती सांभाजीनगर जिल्ह्यातील आदर्श पाटोदा गावचे सरपंच भास्करराव पेरे पाटील यांच्या शुभहस्ते तसेच सरपंच सेवा संघाचे मार्गदर्शक यादवराव पावसे,प्रसिद्ध युवा महिला कीर्तनकार हभप जयश्रीताई तिंकाडे महाराज,संघाचे संस्थापक तथा सरपंच संघटित चळवळीचे नेते बाबासाहेब पावसे, प्रदेशाध्यक्ष रोहित पवार,राज्य संपर्क प्रमुख अमोल शेवाळे, संघटक रविंद्र पवार,विश्वस्त सुजाता कासार,कार्याध्यक्ष रवींद्र पावसे आदी प्रमुख मान्यवरांच्या तसेच सरपंच सेवा संघाच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत गौरविण्यात आले.

## ज्ञानवर्धिनी हायस्कूल मध्ये नवगांताचे स्वागत



**म्हसवड : हॅलो प्रभात**

महाराणी देवी अहिल्याबाई होळकर एज्युकेशन सोसायटी सांगलीच्या ज्ञानवर्धिनी हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज म्हसवड मध्ये इयत्ता पाचवी ते दहावी मध्ये नवीन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पेन देऊन स्वागत करण्यात आले. त्याचबरोबर सर्व शिक्षा अभियानांतर्गत मिळालेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप प्र.प्राचार्य लुनेश विरकर व स्टाफ च्या हस्ते करण्यात आले.यावेळी बी.टी. कलढोणे,एस.सी.सावंत,के. एस.पाटील, सदाशिव ढेरे, प्रविण सुर्यवंशी,प्रा.प्रविण नरळे, अंकुश राऊत,चंदूलाल सय्यद आदी विद्यालयाचा सर्व स्टाफ उपस्थित होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या जानकर यांनी केले तर आभार एस.सी.सावंत यांनी मानले.

# इनरव्हील क्लबच्यावतीने हिरकणी कक्षाची उभारणी

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**



येथील मध्यवर्ती बसस्थानकातील बालकांच्या स्तनपान कक्षाचे इनरव्हील क्लबने सुशोभीकरण केले आहे. त्याचे उद्घाटन नीला कोठारी, बिना बगाडिया, वैशाली लोखंडे यांच्या हस्ते करण्यात आले. इनरव्हील क्लबने बसस्थानकात बाळाला स्तनपान करणाऱ्या आईला आरामदायक वाटावे, प्रवास करता यावे तसेच गरज वाटल्यास विश्रांती घेता यावी, बाळांस झोप मिळावी या उद्देशाने बसस्थानकातील हिरकणी कक्ष सुसज्ज करण्याता निर्णय घेतला. त्यानुसार या कक्षासाठी पलंग, गादी, मच्छरदाणीसहित पाळणा, बेबी खुर्ची, कचरा बादली यासह आवश्यक साहित्य देऊन प्रेरणादायक, आकर्षक स्लोगन चित्रीकरणाने भिंती सुशोभित केल्या आहेत. या कक्षाच्या उद्घाटन सोहळ्यास आगार व्यवस्थापक शिल्पा थोरात, इनरव्हीलच्या अध्यक्षा चंदा कोठारी, सचिव प्रेमलता सारडा, विभा जैन, सुनिता डालमिया, अनिता जैन, मीनाक्षी तंगडी, प्रेमा मर्दा, शिला रांदड, राखी बांगड उपस्थित होते.

## भगवा रक्षक संघटनेच्या वतीने शाळेत वही वाटप

**सांगली : हॅलो प्रभात**

येथील भगवा रक्षक संघटना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया मराठा आघाडी सांगली शहर यांच्या वतीने सांगली मिरज कुपवाड महानगरपालिकेच्या शाळा क्र.७ मध्ये १६ जून रोजी वही वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. सुमारे शंभरहून अधिक विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळाला. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या सांगली जिल्ह्याचे उपाध्यक्ष बापूसाहेब सोनवणे, भगवा रक्षक संघटनेचे धनंजय खाडीलकर श्रीकांत कोळीगीरी उपस्थित होते.

# डॉ.कदम महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन साजरा

**सांगली : हॅलो प्रभात**



येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य शासनाच्या निर्देशानुसार वृक्ष लागवड अभियान राबविण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'जागतिक पर्यावरण दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.व्ही. पोरे यांच्या शुभहस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी ए. एस.सी. कॉलेज, पलूसचे रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा.एस.जी.फाळके प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याप्रसंगी प्र. प्राचार्य डॉ. पोरे उपस्थितांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, अनेक वर्षांपासून पर्यावरणाची हानी झाली आहे. भावी पिढीला ही धोक्याची घंटा असून योग्यवेळी जागृत होऊन पर्यावरण टिकवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन पर्यावरणाचे संवर्धन व संरक्षण केले पाहिजे. नागरिकांमध्ये जनजागृती हवी यासाठी जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजे. पाण्याचा विनियोग योग्य पद्धतीने केला पाहिजे. प्लास्टिकचा वापर टाळता आला पाहिजे.

विजेची बचत केली पाहिजे. प्रत्येक नागरिकाने पर्यावरण विषयी सजग राहिले पाहिजे असे प्रतिपादन केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अमित सुपले, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. विकास आवळे, कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा. अरूण जाधव, डॉ. तृषांत लोहार, डॉ. वर्षा कुंभार, डॉ. वंदना सातपुते, प्रा.जयश्री हाटकर, प्रा. यशवंत धुळगंड, डॉ. आनंद सपकाळ तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निधन वार्ता

### शंकर केरबा चौगुले



**पोर्ले तर्फ ठाणे : हॅलो प्रभात**

येथील श्री शंकर केरबा चौगुले (वय. ९५ ) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. कासारी समूहाचे नेते नामदेव शंकर चौगुले यांचे वडील होत. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. रक्षा विसर्जन (आज) सोमवारी सकाळी ९ वाजता आहे.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ३००० /- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ५००० /- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | ७५०० /- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै. हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976